पाक्षिक

# मनोगत

प्रदेश बीजेपी

मुंबई । वर्ष: 6 । अंक: 8 । 16 एप्रिल, 2024 । पृष्ठसंख्या: 36 । किंमत: 5 रू.





# बूथ विजय महत्वाचा









# अध्यक्षीय मनोगत

# आपला संघर्ष देशासाठी

लोकसभा निवडणूक प्रक्रियेने वेग घेतला आहे. मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या विदर्भात चंद्रपूर आणि रामटेक येथे सभा झाल्या. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. जगत प्रकाश नड्डाजी यांची सभा भंडारा गोंदिया लोकसभा मतदारसंघात झाली. केंद्रीय गृहमंत्री मा. अमित शाह यांच्या सभा नांदेड आणि भंडारा येथे झाल्या. मनोगतचा हा अंक वाचकांच्या हाती येईपर्यंत प्रचाराने आणखी वेग घेतलेला असेल. आपल्या मान्यवर नेत्यांच्या सभांच्या वेळी जनतेची उपस्थिती आणि मिळणारा प्रतिसाद पाहता महाराष्ट्रात सर्वत्र महायुतीला अनुकूल वातावरण आहे, असे दिसते. मोदीजींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्याचा निर्णय जनतेने घेतलेला आहे. मोदीजींच्या सरकारने गेल्या दहा वर्षात केलेले काम आणि आगामी काळात देशाला विकसित करण्याचा केलेला निर्धार यामुळे मोदीजींना जनतेचा प्रचंड पाठिंबा आहे. प्रचारासाठी जेथे जावे तेथे हा पाठिंबा जाणवतो. भारत आता विकसित देश झाला पाहिजे, हा जनतेचाही निर्धार झाला आहे. त्यामुळेच आपण या लोकसभा निवडणुकीत करत असलेला संघर्ष हा देशासाठीचा संघर्ष आहे. मोदीजींच्या राजवटीत गेल्या दहा वर्षात देशातील पंचवीस कोटी लोक गरीबीतून बाहेर आले. आता आपल्याला उरलेल्या सर्वांना गरीबीतून बाहेर आणायचे आहे. प्रत्येकाला राहण्यासाठी पक्के घर, घरात नळाने पाणी, गॅस कनेक्शन, वीज, इंटरनेट, शौचालय अशा सुविधा मिळाल्या पाहिजेत. प्रत्येकाला आरोग्य सुविधा आणि शिक्षणाची संधी मिळाली पाहीजे. भारत ही जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था झाली पाहिजे. आपल्या देशात जगातील सर्वोत्तम इन्फ्रास्ट्रक्चर असले पाहिजे, असे आपले उद्दिष्ट आहे. समाजातील युवा, किसान, महिला आणि गरीब या वर्गाला सोबत घेऊन हा विकसित भारत घडवायचा आहे. या विकसित भारतात समाजातील प्रत्येक घटकाला महत्त्वाचे स्थान असेल. त्यासाठी लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टी आणि मित्र पक्षांना दणदणीत विजय मिळाला पाहिजे. महायुतीच्या उमेदवारांच्या विजयासाठी आपण काम करतो म्हणजे विकसित भारतासाठी संघर्ष करत आहोत. विरोधकांकडे विकासाचे काही मुद्दे नाहीत. त्यांनी स्वतः सत्तेत असताना विकासावर भर दिला नाही. मोदीजींच्या नेतृत्वात दहा वर्षात झालेल्या देशाच्या विकासावर विरोधकांना टीकाही करता येत नाही. त्यामुळे विरोधकांकडून दिशाभूल करण्याचे काम सुरू आहे. आपण मात्र विचलित होता कामा नये. आपले उद्दिष्ट स्पष्ट आहे. ते गाठण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने आपापल्या बूथवर लक्ष केंद्रित करायचे आहे. प्रत्येकाने आपापला बूथ जिंकला की एकूण मोठा विजय मिळणारच आहे. आपण सर्वजण एका विचारधारेच्या आधारे देशाची सेवा करण्यासाठी काम करत आहोत. समाजातील अंतिम व्यक्तीपर्यंत विकास पोहोचला पाहिजे, असा संदेश देणारा अंत्योदय हा आपल्या विचारसरणीचा गाभा आहे. भारतीय जनता पार्टीचा स्थापना दिवस नुकताच दि. ६ एप्रिल रोजी साजरा झाला. जनसंघ आणि भाजपाच्या असंख्य कार्यकर्त्यांनी विचारांसाठी केलेल्या त्याग आणि बलिदानाचे आपण स्मरण केले. त्यांचा वारसा आपण मोदीजींच्या नेतृत्वात पुढे नेत आहोत. मोदीजींच्या नेतृत्वात भारत विकसित होण्याचे स्वप्न साकार होत आहे. आपण आपल्या देशासाठी योगदान देऊ या.

**चंद्रशेखर बावनकुळे**

# अंतरंग







०४ बूथ विजय महत्वाचा

०७ कधीही न फुटलेला पक्ष म्हणजे भाजपा

१० भाजपाचा महाराष्ट्रातील संघर्षपूर्ण प्रवास







१४ जनसंघाच्या कार्यकर्त्यांचे स्मरण ठेवणे आवश्यक

२० डॉ. आंबेडकरांचा विचार प्रत्यक्षात आणणारे मोदी सरकार

२४ २०२४ च्या निवडणुकीसाठी भाजपाचे संकल्पपत्र






संपादक : गणेश हाके

सल्लागार : माधव भांडारी

आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

**संपादकीय सल्लागार**

चंद्रहास मिरासदार

सजावट व मांडणी : गौतम आर्य

सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

**विभागीय समन्वयक**

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी

विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे

पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर

उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी रूम नं. ३०२, गोमती निवास, सस्मिरा रोड, बाणेश्वर मंदिरजवळ, वरळी, मुंबई- ४०००३० यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २५ येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपर्क : ०२२-२२०२२०५०

# बूथ विजय महत्वाचा

● पंतप्रधान नरेंद्र मोदी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ६ एप्रिल रोजी पक्षाच्या स्थापना दिनानिमित्त कर्नाटकातील बूथ प्रमुखांशी व्हर्च्यूअल पद्धतीने संवाद साधला. प्रत्येकाने आपापल्या बूथवर प्रतिस्पर्ध्यापेक्षा अधिक मते मिळवण्यासाठी जोमाने कामाला लागले पाहिजे. प्रत्येक बूथ प्रमुखाने आपल्याला नेमून दिलेल्या बूथवर अधिक मते मिळवली, प्रतिस्पर्ध्यावर आघाडी घेतली म्हणजेच आपण बूथ जिंकला. प्रत्येक बूथ जिंकणे म्हणजेच सहज मोठा विजय मिळेल, असा कानमंत्र पंतप्रधान मोदी यांनी या संवादावेळी बूथ प्रमुखांना दिला. बूथ प्रमुखांना वेगवेगळ्या पद्धतीने प्रश्न विचारून पंतप्रधानांनी कार्यकर्त्यांच्या मतदानाच्या दिवशीच्या तयारीचा आढावा घेतला. या संवादाचा संक्षिप्त अंश.



**आज** ६ एप्रिल. हा आपल्या पक्षाचा स्थापना दिन. जनसेवेसाठी समर्पित होण्याच्या वचनाचा हा दिन आहे. आपल्या पक्षाची विचारधारा जनसामान्यांची सेवा या मूलभूत उद्दिष्टावर आधारित आहे. बूथ प्रमुखाला आपल्या पक्षाच्या संघटनेत अत्यंत महत्वाचे स्थान आहे. बूथ प्रमुख हा पक्षाला मतदारांशी जोडणारा दुवा आहे. म्हणूनच बूथ प्रमुखाने केंद्र सरकारच्या तसेच आपल्या पक्षाचे, एनडीएचे सरकार जेथे असेल त्या राज्यातील सरकारच्या कामगिरीची माहिती मतदारांपर्यंत पोहचवणे आवश्यक आहे. बूथ पातळीवरचे कार्यकर्ते बूथमधील प्रत्येक घराशी, कुटुंबाशी परिचित असतात. मतदार बूथ प्रमुखांना सरकारबद्दलच्या आपल्या अपेक्षा तसेच सरकारबद्दलच्या तक्रारीही मोकळेपणाने सांगू शकतात. बूथ प्रमुखाने मतदारांकडून सरकारबद्दल तसेच आपल्या पक्षाबद्दलच्या अपेक्षा जाणून घेतल्या पाहिजेत. आपल्या बूथमधील गरजू मतदारांपर्यंत सरकारच्या योजना पोहचल्या आहेत की नाहीत, हे कळणे अत्यंत गरजेचे असते. ज्या गरजूंपर्यंत या योजना पोहचलेल्या नाहीत त्यांना या योजनांचे लाभार्थी बनवणे हे ही बूथ प्रमुखाचे काम आहे. या योजनांच्या अंमलबजावणीत काही अडथळे असतील, अडचणी असतील तर याबाबतची माहिती जनतेकडूनच कार्यकर्त्यांना समजू शकेल आणि कार्यकर्त्यांच्या मार्फत ही माहिती सरकारपर्यंत पोहचू शकेल.

आपल्या सरकारची कामगिरी कितीही चांगली असली तरी ती जनतेपर्यंत पोहचली नाही तर संघटनेच्या दृष्टीने ते अपयश आहे. आपल्या सरकारच्या कामगिरीवर योजनांच्या लाभार्थ्यांबरोबर अन्य मतदारही समाधानी असतात, खूश असतात. अशा मतदारांना मतदान करण्यास प्रवृत्त करणे हे आपल्या कार्यकर्त्यांचे कर्तव्य आहे. संघटनेच्या रचनेत म्हणूनच बूथ प्रमुखाला अनन्य साधारण महत्व आहे. त्याला आपल्या बूथमधील पक्षाचे एकनिष्ठ, पक्षाचे सहानुभूतीदार, पक्षाचे विरोधक त्याचबरोबर तटस्थ मतदार ठाऊक असतात. आपल्याला एकनिष्ठ असलेल्या मतदारांचे मतदान लवकरात लवकर करून घेणे तसेच सहानुभूतीदारांचेही मतदान लवकरात लवकर करून घेणे याकडे बूथ प्रमुखाचे लक्ष असायला हवे.

१९८० ते २०२४ अशी आपल्या पक्षाची वाटचाल वैभवशाली आहे. सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या मेहनतीमुळेच आज आपण येथे पोहचू शकलो आहोत. सामान्य कार्यकर्ता हा पक्षाचा मजबूत पाया असतो, अशा लक्षावधी कार्यकर्त्यांनी वर्षानुवर्षे कोणत्याही फळाची अपेक्षा न ठेवता पक्षासाठी मेहनत घेतल्यामुळेच आपला पक्ष विस्तारू शकला. या मेहनती कार्यकर्त्यांच्या बळावरच आपण सलग तिसऱ्यांदा विजय मिळवणार, याची खात्री आहे. आता तुम्हा सर्वांनी आपआपला बूथ जिंकण्याकडे लक्ष द्यायला हवे. त्यासाठीचे नियोजन तुम्ही तयार करून ठेवले पाहिजे. आपल्या सरकारची चांगली कामे मतदारांपर्यंत पोहचवण्याबरोबरच विरोधकांकडून होत असणारा अपप्रचार खोडण्याकडेही आपण लक्ष द्यायला हवे. सामान्य माणसाची सेवा हा आपला मूलमंत्र आहे. त्याचे कोणीही विस्मरण होऊ देऊ नये.

पक्षाच्या विचारधारेबरोबर सरकारच्या कामगिरीचीही सखोल माहिती आपल्या बूथ पातळीवरील कार्यकर्त्यांनी ठेवली पाहिजे. गोरगरिबांना दिलेली वचने कशी पाळली जातात, हे मोदी सरकारने गेल्या १० वर्षात अनेकदा दाखवले आहे. बूथ प्रमुखाच्या दृष्टीने मतदारयादी ही 'भगवद् गीते'प्रमाणे आहे. याचे कारण मतदारयादीचे मनन केल्याशिवाय, चिंतन केल्याशिवाय आपल्याला बूथ विजय मिळवणे शक्य नसते. बूथ प्रमुखाला आपल्या बूथमधील मतदारांची नावे आणि त्यांचे पत्ते पाठ असले पाहिजेत. कोणता मतदार आपला आहे, कोणता विरोधातला आहे, हे बूथ प्रमुखाला माहिती असलेच पाहिजे. त्यासाठी तुमचा मतदारांशी नित्य संपर्क असणे आवश्यक आहे. आपल्या समर्थक मतदारांचे आणि सहानुभूतीदार मतदारांचे मतदान लवकरात लवकर करून घेणे हे बूथ प्रमुखाचे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे काम असते. त्याचबरोबर बोगस मतदान रोखणे हेही बूथ प्रमुखाचे महत्वाचे काम असते.

यावेळी श्री. मोदी यांनी म्हैसूर लोकसभा मतदारसंघातील राजेश (कृष्णराज विधासनभा मतदारसंघातील वॉर्ड क्र. ५७, बूथ क्रमांक ६५) यांच्याशी संवाद साधत त्यांच्याकडून निवडणूक तयारीची माहिती घेतली. पंतप्रधान म्हणाले की, निवडणुकीला अवघे काही दिवस उरले आहेत. असे असताना एवढ्या धावपळीतही मी बूथ प्रमुखांशी बोलतो आहे, याचे कारण आपल्या दृष्टीने बूथ विजय सर्वाधिक महत्वाचा आहे. प्रत्येक बूथ प्रमुखाने पक्षाला आपल्या बूथमधून मताधिक्य मिळवून दिले तर आपला विजय मोठ्या मताधिक्याने होईल. **तुम्ही बूथवरील कामांचे वाटप केले आहे, अशी विचारणाही पंतप्रधानांनी श्री. राजेश यांना केली तसेच तुम्ही तुमच्या बूथमध्ये मताधिक्य मिळवण्यासाठी काय तयारी केली आहे, कोणती योजना आखली आहे, असे प्रश्नही पंतप्रधानांनी राजेश यांना विचारले.** राजेश यांनी बूथमधील कामांचे वाटप झाले असल्याचे सांगितले. प्रत्येक कार्यकर्त्याला आपण कोणते काम करायचे आहे, याची माहिती देण्यात आली आहे. तसेच प्रत्येक पन्ना प्रमुखाला ४० मतदारांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे, असे राजेश यांनी सांगितले. **पन्ना प्रमुखांची बैठक तुम्ही घेतली का, तसेच आलेले साहित्य कार्यकर्त्यांपर्यंत पोहचवण्यासाठी तुम्ही काय करता, असे प्रश्नही पंतप्रधानांनी विचारले.** केंद्रीय कार्यालय आणि प्रदेश कार्यालयाकडून आलेले प्रचार साहित्य वेळेत कार्यकर्त्यांपर्यंत पोहचवणे हे बूथ प्रमुखाचे काम आहे, असेही पंतप्रधानांनी राजेश यांना सांगितले.

## बूथ प्रमुखाने लक्षात ठेवावयाच्या गोष्टी

- मतदारयादीतील आपल्या अनुकूल मतदारांची नावे बूथ प्रमुखाला आणि त्यांच्या सहकाऱ्यांना माहिती असणे आवश्यक असते.
- त्याचबरोबर आपल्या समर्थक मतदारांपैकी ज्या मतदारांचे पत्ते बदलले आहेत, मात्र त्यांचे मतदान पूर्वीच्या बूथमध्ये आहे, अशा मतदारांशी संपर्क करून त्यांचे मतदान करून घेण्यासाठी बूथ कार्यकर्त्यांनीच नियोजन केले पाहिजे.
- वृद्ध आणि ज्येष्ठ नागरिकांना घरून मतदान करण्यासाठीची सोय प्रशासन उपलब्ध करून देते. त्याचाही फायदा घेण्यासाठी बूथ समितीने नियोजन करणे आवश्यक असते.
- हक्काच्या मतदारांपैकी कोणी मतदानाच्या दिवशी बाहेरगावी जाणार असेल तर त्यांचे मतदान करून घेण्यासाठी बूथ समितीने आवश्यक प्रयत्न केले पाहिजेत.
- प्रत्यक्ष मतदानादिवशी हक्काच्या मतदारांचे मतदान करून घेण्यासाठी घरोघरी पोहचणे आवश्यक असते.

## बूथ प्रमुखाने घ्यावयाची दक्षता

■ संघटनेच्या दृष्टीने निवडणुकीचा काळ हा कसोटीचा काळ असतो. या काळात संघटनेला सर्वाधिक कष्ट घ्यावे लागतात.

■ या काळात पक्षाला आपली प्रगती पुस्तकच मतदारांना सादर करावे लागते.

■ पक्षाच्या चिन्हावर निवडून आलेली लोकप्रतिनिधी मंडळी सरकार बनवतात. त्यामुळे सरकार आणि पक्ष हे दोघेही मतदारांना जबाबदार असतात.

■ बूथ प्रमुखाने पन्ना प्रमुखाबरोबर अन्य दोन कार्यकर्ते घेऊन गट बनवावेत. या गटात एखादी महिला असावी.

■ अशा गटांमध्ये घराघरापर्यंत पोहचण्याचे काम दिले पाहिजे. एका गटाला दहा घरांची जबाबदारी दिली पाहिजे.

■ घरोघरी जाताना या कार्यकर्त्याबरोबर केंद्र सरकारच्या कामांची माहिती देणारी पुस्तिका असली पाहिजे. जेथे आपले राज्य सरकार आहे तेथे केंद्र सरकारबरोबरच राज्य सरकाराच्या कामाची माहिती देणारी पुस्तिकाही कार्यकर्त्यांनी घरोघरी वितरीत करावी.

■ काही मतदार आपल्या लोकप्रतिनिधीबाबत आणि सरकारच्या कामाबाबत प्रश्न विचारू शकतात. अशा मतदारांना कार्यकर्त्यांनी योग्य आणि नेमक्या शब्दात उत्तर दिले पाहिजे.

■ मतदारांच्या प्रश्नांना उत्तर देताना तसेच मतदारांशी औपचारिक संवाद साधतानाही कार्यकर्त्यांनी सभ्य भाषेत, नम्रपणे बोलले पाहिजे.

■ घरोघरी जाणाऱ्या कार्यकर्त्यांनी आपण पक्षाचे, सरकारचे प्रतिनिधी म्हणून जात आहोत याचे भान ठेवून बोलले, वागले पाहिजे. बूथ प्रमुखाने आपल्या सर्व कार्यकर्त्यांना याबाबतच्या सूचना योग्य शब्दात देणे आवश्यक असते.

■ बूथ समितीतील सर्व कार्यकर्त्यांना मतदार याद्या मिळाल्या आहेत की नाहीत, प्रचार साहित्य पोहचले आहे की नाही याची खातरजमा बूथ प्रमुखानेच केली पाहिजे.

■ त्या-त्या समाजघटकांसाठीचे प्रचार साहित्य त्या घटकांपर्यंत कार्यकर्त्यांमार्फत पोहचवले जात आहे ना, याची खातरजमाही बूथ प्रमुखाने करणे आवश्यक असते.

■ शेतकरी वर्गासाठीच्या योजनांची माहिती देणारे प्रचार साहित्य ग्रामीण भागातच पोहचले पाहिजे. निवडणुकीच्या धामधुमीत संबंधित यंत्रणेकडून प्रचार साहित्य पोहचवताना अशा काही गडबडी होऊ शकतात. म्हणूनच घरोघरी जाणाऱ्या कार्यकर्त्यांबरोबर त्या भागातील मतदारांनुसार आवश्यक ते प्रचार साहित्य आहे हे बूथ प्रमुखानेच जातीने पाहिले पाहिजे.

यावर श्री. राजेश यांनी प्रत्येक कार्यकर्त्याला दररोज ३० घरांशी संपर्क साधण्याचे उद्दिष्ट देण्यात आल्याचे सांगितले.

प्रचार करताना कार्यकर्ते विभागनिहाय प्रचार फेऱ्या काढतात. या फेऱ्यांमध्ये सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांच्या हाताता झेंडे असतात. विभागातील प्रमुख रस्त्यांवरून या फेऱ्या निघतात. रस्त्यांच्या आतील बाजूला असलेल्या गल्लीबोळांमध्ये फेऱ्यामधील कार्यकर्ते जात नाहीत. वातावरण तयार करण्यासाठी अशा फेऱ्या आवश्यक आहेत. मात्र त्याही पेक्षा महत्वाचा भाग असतो तो घरोघरी जावून मतदारांशी थेट संवाद साधण्याचा. आपले कार्यकर्ते या पद्धतीने थेट संपर्क साधतील, याकडे बूथ प्रमुखाने लक्ष द्यायला हवे. कार्यकर्त्यांनी आपुलकीने चौकशी केल्यास मतदार सुखावतात. आपले मत पक्के होण्यास अशा संवादामुळे मदत होते. घरोघरी जाणाऱ्या कार्यकर्त्याबरोबर आपल्या सरकारच्या कामाचे प्रगती पुस्तक असेलच पाहिजे, त्याशिवाय त्या राज्यात विरोधी पक्ष सत्तेवर असल्यास त्या सरकार विरोधातील मुद्देही बूथ प्रमुखाने कार्यकर्त्यांना तयार करून द्यायला हवेत. विरोधी उमेदवार आणि पक्ष, सरकार यांनी न पाळलेल्या आश्वासनांची माहिती बूथ प्रमुखाने तयार करून घेऊन ती प्रत्येक कार्यकर्त्याकडे द्यायला हवी.

**(पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संवादातून.... )**

# कधीही न फुटलेला पक्ष म्हणजे भाजपा




स्थापना दिनानिमित्त ६ एप्रिल रोजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर येथे पक्ष कार्यकर्त्यांशी संवाद साधला. भारतीय जनता पार्टीचे राजकारणातील वेगळेपण कशात आहे, हे त्यांनी विस्ताराने विशद केले. त्यांच्या मार्गदर्शनाचा संक्षिप्त अंश.

**भारतीय** जनता पार्टी हा पक्ष आज जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष म्हणून ओळखला जातो. आपल्या पक्षाच्या सदस्य संख्येच्या आधारावर आपण जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष बनण्याचा मान मिळवला आहे. भारतात आपला पक्ष सर्वाधिक खासदार, सर्वाधिक आमदार, सर्वाधिक महापौर, सर्वाधिक नगराध्यक्ष, स्थानिक स्वराज्य संस्थांचे सर्वाधिक सदस्य असलेला पक्ष आहे. १९५१ पासून भारतीय जनसंघाच्या रूपाने आपण देशाच्या राजकारणात आहोत. आपल्या पक्षाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे आपला पक्षात कधीच उभी फूट पडलेली नाही. आपण स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देशाच्या राजकीय इतिहासाकडे पाहिले तर राष्ट्रीय राजकारणातील सर्व प्रमुख पक्षांमध्ये अनेकदा उभी फूट पडल्याचे दिसून येते. देशाची सत्ता अनेक वर्षे काँग्रेसकडे होती. या काँग्रेसमध्येही अनेकदा उभी फूट पडली आहे. कम्युनिस्ट पक्षाचा इतिहास फुटीचाच आहे. समाजवादी चळवळीतील पक्षांची मोजदाद करता येणार नाही, इतक्या वेळेस शकले उडाली आहेत. भारतीय जनता पार्टीतून काही तात्वीक मतभेदातून काही नेते बाहेर पडले. मात्र पक्षात आजवर एकदाही उभी फूट पडली नाही. याचे मुख्य कारण आपली संघटना विचारांच्या पायावर उभी आहे. आपल्या पक्षात नेत्यांच्या, पदाधिकाऱ्यांच्या वैयक्तिक महत्वकाक्षांना स्थान नाही. 'राष्ट्र प्रथम, नंतर संघटना सर्वात शेवटी मी' या तिहेरी विचार सूत्रानुसार आपली संघटना काम करत असते. डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी जनसंघाची स्थापना केली. दीनदयाल उपाध्याय, अटलबिहारी वाजपेजी असे सहकारी श्यामाप्रसादजींना मिळाले. भारतीय जनता पार्टीत



**बूथ विजय अभियान–** प्रत्येक बूथवर मागील निवडणुकीपेक्षा ३७० मते अधिक मते मिळवण्यासाठी बूथ विजय अभियान सुरू करण्यात आले आहे. याच अभियानांतर्गत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या दक्षिण-पश्चिम नागपूर मतदारसंघातील बूथ प्रमुखांशी संवाद साधला.

अटलजींबरोबर, अडवाणीजी, मुरली मनोहर जोशीजी यांनी पक्ष वाढवण्यासाठी अविश्रांत मेहनत घेतली. आता पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी.नड्डा, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे आपले नेतृत्व आहे. डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी, दीनदयाल उपाध्याय, अटलजी, अडवाणीजी, मुरली मनोहर जोशीजी आणि सध्याचे विद्यमान राष्ट्रीय नेतृत्व यांच्याकडे पाहिल्यावर एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे आपले राष्ट्रीय नेतृत्व कधीच आत्मकेंद्रीत नव्हते, आपले राज्यपातळीवरचे नेते, पदाधिकारी, सामान्य कार्यकर्ते हेही आत्मकेंद्रीत नव्हते. पक्षाच्या वाढीसाठी मी एवढे प्रयत्न करतो आहे तर मला पक्षाकडून काही मिळाले पाहिजे, यासारख्या इच्छा न बाळगता निस्वार्थी भावनेने आपले नेते आणि कार्यकर्ते वर्षानुवर्षे कार्य करत राहिले. आपला पक्ष कोणाला तरी पंतप्रधान बनवण्यासाठी, कोणाला तरी मुख्यमंत्री बनवण्यासाठी, एकूणच कोणत्याही प्रकारची सत्ता मिळवण्यासाठी जन्माला आलेला नाही. देशाला सुजलाम सुफलाम करण्यासाठी, देशातील सर्वात शेवटच्या व्यक्तीला न्याय देण्यासाठी आपल्या पक्षाचा जन्म झाला आहे. अन्य पक्षांमध्ये आणि आपल्या पक्षामध्ये हाच मोठा आणि मूलभूत फरक आहे. या विचाराच्या आधारावर आपला पक्ष अनेक वर्षे संघर्ष करून आज सध्याच्या स्थितीपर्यंत पोहचला आहे. देशाच्या, मातृभूमीच्या कल्याणाचा विचार हा आपल्या संघटनेचा पाया असल्याने आपल्या पक्षात कधीच उभी फूट पडली नाही.

१९७५ मध्ये त्यावेळच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशावर आणीबाणी लादून संविधानाला हरताळ फासला. या एकाधिकारशाही विरोधात एकत्र येऊन लढण्यासाठी आपला पक्ष जनसंघ त्या काळात जनता पार्टीत विलीन झाला होता. त्यावेळी देशावर असलेले एकाधिकार शाहीचे, हुकूमशाहीचे संकट परतवण्यासाठी आपण जनता पार्टीत सामिल होण्याचे निर्णय घेतला. इंदिरा गांधी यांनी देशभरातील विरोधी नेत्यांना, कार्यकर्त्यांना तुरुंगात धाडून संविधानाचा गळा घोटला. त्यावेळी देशाच्या लोकशाही व्यवस्थेपुढे उभे ठाकलेले गंभीर आव्हान लक्षात घेऊन देशहिताला प्राधान्य देत आपल्या राष्ट्रीय नेतृत्वाने जनसंघाचे जनता पार्टीत विलीनीकरण केले. जनता पार्टीमध्ये जनसंघाचे सर्वाधिक खासदार निवडून आले असतानाही आपण पंतप्रधानपदाचा किंवा अन्य सत्तापदांचा आग्रह धरला नाही. त्यावेळी आपल्या दृष्टीने देश महत्वाचा होता. त्यावेळी जनसंघाच्या नेतृत्वाने मोरारजी देसाई यांना पंतप्रधानपदासाठी पाठिंबा दिला होता. इतिहासातील या घटना मी मुद्दाम सांगतो आहे. याचे कारण आपणा सर्वांना पक्षाची विचारसरणी, तत्वप्रणाली योग्य पद्धतीने कळायला हवी.

१९८० मध्ये आपण भारतीय जनता पार्टीच्या रूपाने नवा जन्म घेतला. अत्यंत कठीण परिस्थितीत आपल्या पक्षाची वाटचाल सुरू झाली. पक्षाचे पहिले अधिवेशन मुंबईत झाले. त्यावेळी अटलजींनी लाखोंच्या जनसमुदायापुढे बोलताना, 'अंधेरा छटेगा, सूरज निकलेगा, कमल खिलेगा' अशी भविष्यवाणी केली. ही भविष्यवाणी प्रत्यक्षात आली. मात्र तोपर्यंतची वाटचाल मुळीच सोपी नव्हती. पक्ष वाढवत असताना नेत्यांना, पदाधिकाऱ्यांना, कार्यकर्त्यांना अपमान, उपेक्षा, टिंगलटवाळीचा सामना करावा लागला. १९८४ मध्ये श्रीमती इंदिरा गांधी यांची हत्या झाली. त्या घटनेनंतर काँग्रेसबद्दल सहानुभूतीची लाट निर्माण झाली. परिणामी १९८४ मध्ये झालेल्या

**नागपूर- दक्षिण-पश्चिम बूथ क्रमांक १८२ आणि ३५४ च्या स्थानिक मतदारांच्या घरी भेट**



संजय जोशी (जय प्रकाश नगर)



नारायण देवतळे (तपोवन)



अरुण बेलखोडे (राजीव नगर)



आनंद सुके (जय प्रकाश नगर)



कवडू आमटे (तपोवन)

लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीचे अवघे दोन खासदार निवडून आले. त्यावेळी, 'पर्याय पर्याय म्हणतात कोण, ज्यांचे खासदार निवडून आलेत दोन' अशा शब्दात आपली यथेच्छ चेष्टा केली गेली. पराभवाचे अनेक घाव सहन करत आपण टिकून राहिलो. नुसते टिकून राहिलो नाही तर वाढत राहिलो. याचे कारण प्रारंभी उल्लेख केल्याप्रमाणे आपल्या पक्षाची विचारधारा. राष्ट्रीय आणि प्रादेशिक राजकारणातले अनेक पक्ष काळाच्या ओघात संपून गेले. पण आपण टिकून राहिलो. १९८४ चे दोन खासदार ते २०१९ चे ३०३ खासदार अशी आपली वाटचाल राहिली आहे.


१९९८ ते २००४ अशी सहा वर्षे अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार केंद्रात सत्तेत होते. या सहा वर्षात देशाच्या सर्वांगीण विकासाची मुहूर्तमेढ रोवली गेली. आधुनिक भारताचा पाया अटलजींच्या नेतृत्वाखालील सरकारने या काळात घातला. अटलजींच्या सरकारने १९९८ मध्ये पोखरण येथे अनुचाचणी करून नव्या भारताचे दर्शन जगाला घडवले. त्यांच्याच काळात राष्ट्रीय महामार्गांचा सुवर्ण चतुष्कोन आकाराला आला. पंतप्रधान ग्राम सडक योजना सुरू करून ग्रामीण भागातील रस्त्यांचे जाळे बळकट करण्याचा प्रयत्न झाला. अटलजींच्या काळात सुरू झालेली विकासाची यात्रा कळसाला नेण्याचे काम मोदीजींच्या नेतृत्वाखालील सरकारने गेल्या १० वर्षात केले आहे. 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास, सबका प्रयास' या मंत्राच्या आधारे जगातील पाचव्या क्रमाकांची अर्थव्यवस्था बनवण्याचे काम मोदी सरकारने केले आहे.


स्थापनादिनाच्या निमित्ताने आपण सर्व कार्यकर्त्यांनी मोदी सरकारने गोरगरीब, वंचित, शोषितांच्या विकासासाठी सुरू केलेल्या विकसित भारत संकल्प यात्रेला समाजातील शेवटच्या माणसांपर्यंत नेण्याचे काम करावयाचे आहे. मोदी सरकारच्या विकसित भारत संकल्प यात्रेचे आपण सर्व सैनिक आहोत. आपण सर्व कार्यकर्ते भाग्यवान आहोत याचे कारण आपणां सर्वांना मोदींजीसारख्या नेत्याचे सैनिक म्हणून काम करण्याची संधी मिळाली आहे. ही निवडणूक आपण भारतीय जनता पार्टीला सत्ता मिळावी म्हणून लढत नसून भारताला आंतरराष्ट्रीय पातळीवर समृद्ध, विकसित आणि बलशाली राष्ट्र बनवण्यासाठी लढत आहोत. स्थापनादिनी आपण पक्षाच्या ध्येय धोरणानुसार देशसेवेसाठी यापुढेही काम करत राहण्याचा संकल्प करावयाचा आहे. विकसित भारतचा संकल्प पूर्ण होत नाही तोपर्यंत आम्ही थांबणार नाही, असा निर्धार आपण सर्वांनी करावयाचा आहे.


**जय हिंद, जय महाराष्ट्र**

# भाजपाचा महाराष्ट्रातील संघर्षपूर्ण प्रवास


उत्तमराव पाटील


गोपीनाथ मुंडे



प्रमोद महाजन


सूर्यभान वहाडणे


रामभाऊ म्हाळगी


वसंतराव भागवत


पांडुरंग फुंडकर


हरिभाऊ बागडे


हशू अडवाणी


मोतीराम लहाने

● माधव भांडारी, प्रदेश उपाध्यक्ष (मुख्यालय)

आज भाजपा सलग तिसऱ्यांदा केंद्रातील सत्ता मिळवण्याच्या मार्गावर आहे. अनेक राज्यांत आपला पक्ष सत्तेवर आहे. मात्र एकेकाळी आपले हाताच्या बोटावर मोजण्या इतकेच खासदार, आमदार असत, यावर नव्या पिढीचा विश्वास बसणार नाही. जनता पार्टीमधून बाहेर पडून ६ एप्रिल १९८० रोजी पक्षाची स्थापना झाली तेव्हा लोकसभेच्या निवडणुका नुकत्याच होऊन गेल्या होत्या. अवघ्या दोन वर्षांपूर्वी २९५ जागा जिंकून इतिहास घडवणारी जनता पार्टी त्या निवडणुकीत केवळ ३१ जागा जिंकू शकली होती. त्यापैकी एकोणीस लोकसभा सदस्य भाजपामध्ये सामील झाले होते. त्यामध्ये पूर्वाश्रमीचे जनसंघाचे बहुतेक सदस्य तर होतेच शिवाय सिकंदर बख्त, शांतिभूषण, राम जेठमलानी यांच्यासारखे बिगर जनसंघी सुद्धा होते. पण १९८४ साली झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत त्यांच्यापैकी कोणीही निवडून येऊ शकले नाहीत. अटलबिहारी वाजपेयींसह सर्व शीर्षस्थ नेते पराभूत झाले होते. सगळ्या देशाला अपरिचित असलेले केवळ दोन सदस्य निवडून आले. पक्षाच्या इतिहासातला तो सर्वात अवघड कालखंड होता.

**महाराष्ट्रात** तर परिस्थिती अधिक अवघड होती. महाराष्ट्र हा खऱ्या अर्थाने त्या काळातला काँग्रेसचा बालेकिल्ला होता. १९७२ साली जनसंघाचे केवळ पाच सदस्य महाराष्ट्र विधानसभेत निवडून गेले होते. तर १९७८ साली झालेल्या निवडणुकीत जनता पार्टीला फक्त ९९ जागा जिंकता आल्या होत्या, त्यात साधारणपणे ३०जण पूर्वाश्रमीच्या जनसंघाशी नाते सांगणारे होते. १९८० साली भाजपाची स्थापना करताना जनता पार्टीच्या आमदारांपैकी ३४ जण भाजपात सामील झाले. त्याच वर्षी महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका झाल्या. 'भारतीय जनता पार्टी' हे नाव आणि 'कमळ' हे नवे चिन्ह घेऊन लढवलेली ही देशातली पहिली निवडणूक! त्या निवडणुकीत आमच्या पदरात फक्त १४ जागा आणि ९.४% मते पडली होती. त्यावेळेला पक्षाचे नाव व निशाणी लोकांपर्यंत घेऊन जाण्याच्या उद्देशाने आम्ही जास्तीत जास्त जागा लढवण्याचा प्रयत्न सर्व ताकत लावून केला होता. त्यानंतर सुद्धा आम्ही केवळ १४५ उमेदवारच उभे करू शकलो होतो. जवळ जवळ पंधरा वर्षे आमची ही परिस्थिती कायम होती. १९९० मध्ये पहिल्यांदा आम्ही ४२ जागांवर पोचलो पण मतांचा वाटा मात्र ११% च्या खालीच होता. त्याच काळात आम्ही शिवसेनेबरोबर युती केली आणि ती तीस वर्षे चालवली. युतीमुळे आम्ही एकदा सत्तेत आलो हे जरी खरे असले तरी पक्षाच्या वाढीला युतीमुळे स्वाभाविक मर्यादा पडल्या होत्या. त्या युतीमुळे विधानसभेच्या केवळ ४०% व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये त्याही पेक्षा कमी साधारण ३०% जागा आमच्या वाट्याला येत असत.

पक्ष स्थापन झाल्यानंतर ३४ वर्षांनी पहिल्यांदा २०१४ साली आम्ही महाराष्ट्रात विधानसभेच्या सर्वाधिक म्हणजे २६१ जागा स्वबळावर लढवल्या. त्या निवडणुकीत २८% मते मिळवून व १२२ जागा जिंकून आम्ही पहिल्या क्रमांकावर आलो. २०१९ च्या निवडणुकीत शिवसेनेबरोबर पुन्हा युती केल्यामुळे आम्ही फक्त १६४ जागा लढवल्या व त्यातल्या १०५ जिंकल्या. आम्ही आमचा पहिला क्रमांक टिकवला हे खरे असले तरी युतीमुळे आम्ही मतांची टक्केवारी आणि जागा गमावल्या हे वास्तव होते. पण ह्याच काळात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आमचा पाया मोठ्या प्रमाणात विस्तारण्यात आम्ही यश मिळवले. लोकसभा, विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्था ह्या सर्व स्तरावर आज आम्ही पहिल्या क्रमांकावर आहोत.

अर्थात हे दिवस सहजासहजी आलेले नाहीत. सर्वोच्च नेत्यापासून तळागाळातल्या सामान्य कार्यकर्त्यापर्यंत सर्वांचे कमालीचे कष्ट त्यामागे आहेत. जनसंघाच्या उभारणीसाठी त्याकाळात जे परिश्रम सर्वांनी घेतले आहेत त्याची कल्पना सुद्धा आज कोणी करू शकणार नाही. माणसांपासून साधनांपर्यंत प्रत्येक गोष्टीचा अभाव एवढी एकच निश्चिती होती. तरीही आपले विचार लोकांपर्यंत घेऊन जाण्यासाठी करावे लागणारे सर्व प्रकारचे कष्ट प्रत्येकजण करत होता. आज लोकांना कल्पनासुद्धा करता येणार नाही पण १९७२ सालापूर्वी अटलजींनी आणि दीनदयाळजींनी महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यात किमान एक तरी दौरा केला होता. तसेच दौरे त्यांनी १९८० ते ८३ या काळात केले होते. उत्तमराव पाटील गेले नव्हते असा एकही तालुका महाराष्ट्रात नव्हता. त्याखेरीज नेत्यांची एक फौज होती ज्यांनी महाराष्ट्र उभा आडवा पिंजून काढला होता. त्या सर्वांची नुसती नावे देण्यासाठी स्वतंत्र लेख लिहावा लागेल. त्या सर्वांनी ज्या अडचणींना तोंड देऊन पक्ष वाढवला त्यांचीही कल्पना आज कोणी करू शकणार नाही.

आम्हाला टिकू न देण्याचा निर्धार त्या काळातल्या सत्ताधारी शक्तींनी केला होता. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षांपासून खेड्यापाड्यातले लहान लहान कार्यकर्ते सुद्धा त्यापायी हत्येचे, हिंसाचाराचे लक्ष्य बनले. पण तरीसुद्धा जनतेपर्यंत पोचण्याचे, त्यांच्याशी स्वत:ला जोडून घेण्याचे प्रयत्न आम्ही कधी सोडले नाहीत. वारंवार झालेल्या पराभवामुळे आम्ही कधी खचून गेलो नाही. क्षणिक निराशा आली तरी ती झटकून टाकून पुन्हा जनतेकडे जाण्यात आम्ही कधी टाळाटाळ केली नाही. 'आम्हाला मते न देणारी जनता मूर्ख आहे' ही भावना कधीच आमच्या मनाला शिवली नाही. पराभव झाल्यानंतर त्याची कारणे शोधून काढून ती दूर करण्यावर आम्ही भर दिला. १९८४ च्या ऐतिहासिक पराभवाची कारणे शोधण्यासाठी ज्येष्ठ नेते कै. सुंदरसिंग भंडारी यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने एक समिती नेमली होती. त्या समितीने प्रत्येक जिल्ह्यात जाऊन कार्यकर्त्यांबरोबर चर्चा करून आपला अहवाल दिला होता. त्या अहवालानुसार आपली धोरणे, कार्यपद्धती या सर्व बाबतीत पक्षाने अनेक बदल केले. बेचाळीस वर्षांच्या ह्या वाटचालीत भारतीय जनता पार्टीने अनेक चढउतार पाहिले आहेत, टक्केटोणपे खाल्ले आहेत, धक्के सहन केले आहेत. ■

# भाजपाच्या वाटचालीत 'स्त्री शक्ती' चा मोलाचा वाटा


विजयाराजे शिंदे


सुमित्रा महाजन


सुषमा स्वराज


सुशीलाताई आठवले


निर्मला सीतारमण


सुमतीताई सुकळीकर


जयवंतीबेन मेहता


उमा भारती


शोभा फडणवीस


स्मृती इराणी

> भारतीय जनता पार्टीच्या जडणघडणीत आणि यशात जसा महिला मतदारांचा वाटा आहे तितकाच वाटा 'ती' चा अर्थात महिला नेतृत्वाचा आणि कार्यकर्त्यांचा आहे. भाजपाबद्दल बोलत असताना साहजिकच जनसंघ ते भाजपा अशा प्रवासाबद्दल बोलणे क्रमप्राप्तच आहे. १९५१ पासूनच जनसंघ आणि नंतर १९८० साली भाजपाच्या उभारणी आणि बांधणीमध्ये आणि नंतर पक्ष विस्तारात पक्षाने नेहमीच महिलांना योग्य स्थान व सन्मान दिला आहे.

**जनसंघाच्या** स्थापनेपासून कितीतरी महिला कार्यकर्त्यांची नावे तोंडी येतात, ज्यांनी त्या काळात संघर्ष करत घरसंसार सांभाळून, जनसंघाची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचवण्याचे महा कठीण काम केले होते. महिलांना राजकारणात कार्य करण्यास प्रोत्साहित करून त्यांना सुरक्षा आणि सुव्यवस्था देण्यापर्यंतची सर्व धुरा जनसंघाच्या स्थापनेपासून स्व. वसंतराव भागवत यांच्याकडे होती. राजकारणात महिला सक्रीय व्हाव्या म्हणून त्या काळी महाराष्ट्रात पंत पटवर्धन आणि रामभाऊ गोडबोले या जनसंघाच्या पूर्णवेळ कार्यकर्त्यांना जबाबदारी दिली होती. या प्रयत्नातूनच पुढे अनेक निष्ठावान महिला कार्यकर्त्यांची फौजच उभी राहिली, विदर्भातील मध्यमवर्गीय पांढरपेशा समाजातील महिला, समाजकारण आणि राजकारणात रस घेऊ लागल्या ते केवळ सुमतीताई सुकळीकरांमुळेच. स्थानिक पातळीवर कार्य करून पुढे राष्ट्रीय कार्यकारिणीत प्रभावी नेता म्हणून मालतीबाई परांजपे यांनी झोकून देत काम केले. शोभा फडणवीस, डॉ. क्षेमाताई थत्ते, निर्मला


कुसुमताई अभ्यंकर


कुमुदिनी रांगणेकर

**कुसुमताई अभ्यंकर आणि कुमुदिनी रांगणेकर या भारतीय जनता पार्टीच्या पहिल्या महिला आमदार होत्या. १९७८ मध्ये कुसुमताई अभ्यंकर जनता पक्षाच्या तिकिटावर विधानसभेत निवडून गेल्या. त्यावेळी जनसंघ जनता पक्षात विलीन झाला होता. १९८० मध्ये कुसुमताई भाजपा उमेदवार म्हणून रत्नागिरी मतदारसंघातून निवडून गेल्या. कुमुदिनी रांगणेकर १९७८ मध्ये जनता पक्षातर्फे तर १९८४ मध्ये भाजपातर्फे औरंगाबाद पदवीधर मतदारसंघातून विधान परिषदेवर निवडून गेल्या.**

शेंडे, सोनूबाई भोसले, शांताबाई लिमये ही आणि अशी अनेक नावे घेता येतील की ज्यांनी पक्ष वाढीच्या ध्यासाने निरलस वृत्तीने काम करत विविध क्षेत्र आणि स्तरातील महिलांना जनसंघाशी जोडले. या दरम्यान पक्षाचा प्रत्येक लढा, मोर्चा, सत्याग्रह, आंदोलन, अयोध्या कारसेवा, आणीबाणी काळात जेलभरो आंदोलन या सर्वांत रणरागिणींचा सक्रीय सहभाग होता.

१९६२ च्या दरम्यान रामभाऊ म्हाळगींच्या नेतृत्वात जनसंघात स्वतंत्र महिला आघाडी स्थापन होऊन महिलांच्या नेतृत्व गुणांना वाव दिला गेला. राजमाता विजयाराजे शिंदे यांनी जनसंघात, जनता पक्ष आणि नंतर भाजपामध्ये झोकून देऊन काम केल्यामुळे सात वेळा त्या खासदार होत्या. भाजपाने त्यांची राष्ट्रीय उपाध्यक्षपदी नियुक्ती केली. तसेच इंदूर नगरपालिकेत वरिष्ठ नगरसेवक, शहराच्या उप–महापौर, केंद्रीय मंत्री आणि नंतर लोकसभा अध्यक्ष राहिलेल्या सुमित्रा महाजन, अनेक केंद्रीय मंत्री, खासदार, आमदार, फडणवीस सरकारच्या काळात मंत्री म्हणून भाजपाने अनेक महिला कार्यकर्त्यांवर सार्थ विश्वास दाखवत कार्य सोपवले आणि त्यांनी पक्षाने दिलेल्या प्रत्येक संधीचे सोने केले.

भारताच्या पहिल्या पूर्णवेळ महिला परराष्ट्र मंत्री स्व.सुषमा स्वराज, संरक्षण मंत्री आणि विद्यमान अर्थ मंत्री निर्मला सीतारमण, महिला आणि बालविकास मंत्री स्मृती इराणी ही प्रभावी नेतृत्व पक्षाने घडवली. भाजपाने

**आज जरी आपल्या पक्षाचा मोठा विस्तार झालेला असला तरी १९५२–१९८० आणि १९८० नंतर अनेक वर्षे आपल्याला पक्ष बांधणीसाठी, आपले अस्तित्व टिकवण्यासाठी प्रचंड संघर्ष करावा लागला आहे. या संघर्षात पक्षाने केलेल्या आंदोलनांचा मोठा वाटा होता. महिला शक्तीने पक्षाच्या अनेक आंदोलनांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन आपले अस्तित्व सातत्याने दर्शवून दिले होते. सभासद नोंदणी करणे, निधी जमा करणे, निवडणुकीत घरोघरी जावून मतदारांना स्लीप वाटणे या कार्यातही महिला शक्तीने आपल्या परीने योगदान दिले आहे. काँग्रेस काळात महागाई विरोधात जनसंघ आणि भारतीय जनता पार्टीने रस्त्यावर उतरून अनेकदा आंदोलने केली. महागाई विरोधी आंदोलनांमध्ये सुशिलाताई आठवले, जयवंतीबेन मेहता, डॉ.क्षेमाताई थत्ते, सुमतीताई सुकळीकर, पुष्पा वागळे, सुलभा ओक, मिराताई पावगी, वीणा भाटीया, उर्मिला आपटे यासारख्या असंख्य महिला कार्यकर्त्यांनी भाग घेऊन पक्षाचा महिला वर्गातील पाया विस्तारण्याचा प्रयत्न केला.**

आत्तापर्यंत सुषमा स्वराज, आनंदीबेन पटेल, वसुंधराराजे, उमा भारती यांच्यावर राज्याच्या मुख्यमंत्रीपदाची धुरा सोपवली. महाराष्ट्रातून भाजपच्या डॉ. प्रीतम मुंडे, डॉ. भारती पवार, रक्षा खडसे, पूनम महाजन, डॉ. हिना गावीत या खासदार म्हणून निवडून गेल्या. फडणवीस सरकारच्या काळात पंकजा मुंडे, विद्या ठाकूर यांना मंत्रीमंडळात स्थान मिळाले होते. महिला मोर्चा तसेच पक्षाने कार्यकारिणीत, पदाधिकारी निवडीमध्ये वेळोवेळी महिलांना यथोचित स्थान दिले आहे. पक्षाच्या सामान्य महिला कार्यकर्तीच्या मनात देखील आपल्या कार्याची योग्य दखल घेतली जाईल हा विश्वास असतो. केवळ महिलांचा विकास नव्हे तर महिलांच्या नेतृत्वाखाली विकास ह्या ब्रिदवाक्यानुसार भाजपाची वाटचाल सुरू आहे. भाजपा नेहमीच समाजातील प्रत्येक घटकाला समान संधी आणि समान हक्क देण्याच्या दृष्टीनं अग्रेसर राहिली आहे, अर्ध्या लोकसंख्येचं प्रतिनिधित्व करणाऱ्या महिला घटकाला राजकारणात, धोरण प्रक्रीयेत न्याय्य स्थान, संधी आणि सन्मान नेहमीच दिला गेला. केवळ 'रबरी शिक्का' न रहाता त्याला स्वयंनिर्णयाची शाई ही महिला नेतृत्वाच्या कर्तृत्वामुळे आणि पक्ष पाठिंब्यामुळे लागली. ■

# जनसंघाच्या कार्यकर्त्यांचे स्मरण ठेवणे आवश्यक

> स्थापना दिनाच्या निमित्ताने जनसंघाच्या कार्यासाठी योगदान देणाऱ्या कार्यकर्त्यांचे स्मरण करणे अत्यावश्यक आहे. जनसंघाचे काम करताना हजारो कार्यकर्त्यांनी स्वतःचे जीवन समर्पित केले. वैयक्तिक सुख, आशा-आकांक्षाचा विचार न करता या कार्यकर्त्यांनी घेतलेल्या परिश्रमामुळेच भारतीय जनता पार्टी आज यशाच्या सर्वोच्च स्थानी जाऊन पोहचली आहे.

**भारतीय** जनता पार्टीने ४२ वर्षाच्या प्रवासात बरे-वाईट दिवस पाहिले आहेत. एका निवडणुकीत आपले फक्त दोन खासदार निवडून आले होते त्यावेळी 'हम दो, हमारे दो' या भाषेत आपल्या पक्षाची आणि नेत्यांची टिंगल केली गेली होती. हाच पक्ष आज केंद्रात आणि १८ राज्यात सत्तेत आहे. यापैकी १२ राज्यात आपला पक्ष स्वबळावर सत्तेत आहे. आपल्या पक्षाचे वेगळेपण म्हणजे आपण राष्ट्रवाद, अंत्योदय यासारख्या विचारधारेच्या आधारे वर्षानुवर्षे काम करत आहोत. अनेक राष्ट्रीय व प्रादेशिक पक्ष काही कुटुंबांपुरते मर्यादित बनलेले असताना आपण घराणेशाहीचा कडाडून विरोध करत आहोत.

प्रखर राष्ट्रवाद हा आपल्या विचारधारेचा आधारस्तंभ आहे. 'हम रहे ना रहे देश बढे, हम रहे ना रहे विचारधारा बढे' हा मंत्र लक्षात ठेऊन आपण काम करत आहोत. काश्मीर बाबत अनेक पक्षांनी आपल्या भूमिका वेळोवेळी बदलल्या मात्र आपण १९५१ पासून 'एक देश में दो निशाण, दो विधान, दो प्रधान नहीं नही चालेलेंगे' अशी विचारधारा घेऊन कार्यरत होतो.

काश्मीरच्या स्वतंत्र दर्जा विरोधात अनेक वर्ष सातत्याने संघर्ष केल्यानंतर आपण केंद्रात स्वबळावर सत्ता आल्यावर काश्मीरला वेगळा दर्जा देणारे घटनेतील कलम '३५अ' रद्द केले. विचारधारेतील सातत्य हे आपल्या पक्षाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे. आपल्या भूमिका राजकीय सोय पाहून बदलत नाहीत. दीनदयाळ उपाध्याय यांनी अंत्योदयाचा विचार जनसंघाची विचारधारा म्हणून रूढ केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या सरकारच्या अनेक योजनांच्या माध्यमातून समाजातील सर्वात अविकसित माणसापर्यंत विविध योजनांची फळे पोहचवली. पक्षाच्या कार्यकर्त्यांनी मोदी सरकारच्या योजनांचा लाभ गरजूंपर्यंत पोहचतो आहे की नाही याकडे लक्ष ठेवणे आवश्यक आहे.

अनेक पक्ष कुटुंबांच्या मालकीचे बनलेले असताना आपण बूथ समित्यांपासून राष्ट्रीय अध्यक्षांच्या निवडीपर्यंत लोकशाही परंपरेचे पालन करत आहोत. सर्व पदांच्या निवडणुकांमध्ये लोकशाही प्रक्रिया पाळली जात आहे. त्यामुळे सामान्यातल्या सामान्य कार्यकर्त्याला पक्षातील पदे भूषविण्याची संधी मिळते आहे.

पक्षाच्या कार्यकर्त्यांनी स्थापना दिनाच्या निमित्ताने पक्षाचा राष्ट्रवादाचा, गरीब कल्याणाचा विचार जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहचविण्यासाठी कटिबद्ध होण्याचा संकल्प केला पाहिजे. त्याचबरोबर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'सब का साथ, सब का विश्वास, सब का विकास' या मंत्राच्या आधारावर कार्यरत होण्याचा निर्धारही आपण या निमित्ताने करूया. भाजपाच्या या वाटचालीमागे जनसंघ बांधणीसाठी ज्या नेत्या-कार्यकर्त्यांनी आपले आयुष्य खर्ची घातले त्यांच्या परिश्रमाचा मोठा वाटा आहे. देशाची सत्ता सलग दोनदा आणि अनेक राज्यात सत्ता असणारा भारतीय जनता पक्ष आज यशोशिखरावर असला तरी ही वाटचाल सोपी नव्हती. संघर्ष, परिश्रम, अपमान, उपेक्षा, टिंगलटवाळी, विद्वेषी अपप्रचार अशा अनेक अडथळ्यांना तोंड देत जनसंघाचे नवे रूप म्हणजे भारतीय जनता पक्ष आज येथवर पोचला आहे. भारतीय जनता पक्षाच्या ४२

व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने जनसंघाच्या उभारणीसाठी १९५२ पासून स्वतःला समर्पित करणाऱ्या कार्यकर्त्यांचे स्मरण करणे उचित ठरेल. याच मंडळींच्या योगदानामुळे जनसंघाला महाराष्ट्रात आपले अस्तित्व निर्माण करता आले. १९५२ ते १९७७ या काळात महाराष्ट्रात जनसंघ प्रबळ राजकीय शक्ती जरी बनला नव्हता तरी जनसंघाने अन्य विरोधी पक्षांच्या तुलनेत वेगाने हातपाय पसरले होते, हे मान्य करावेच लागेल. या काळात जनसंघाची ओळख निर्माण करण्यासाठी उत्तमराव पाटील, लक्ष्मणराव मानकर, मोतीराम लहाने, रामभाऊ म्हाळगी, रामभाऊ गोडबोले, सूर्यभान वहाडणे पाटील, मधुकरराव महाजन, वसंतराव भागवत, सुशीलाताई आठवले, क्षेमाताई थत्ते, हशू अडवाणी अशा असंख्य ज्ञात-अज्ञात नेत्या, कार्यकर्त्यांनी केलेली नांगरट भारतीय जनता पक्षाच्या प्रसारास पोषक ठरली. अन्य राज्यांपेक्षा महाराष्ट्रात जनसंघाला आपल्या प्रसारासाठी महात्मा गांधींच्या हत्येनंतर हिंदुत्ववादी संघटना आणि एका विशिष्ट समाजाविरोधात सुरु करण्यात आलेल्या विखारी प्रचाराचा प्रामुख्याने सामना करावा लागला. महात्मा गांधींच्या हत्येचा ठपका राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि एकूणच हिंदुत्ववादी शक्तींवर ठेवून प्रचार मोहिम उघडली गेली. या अडथळ्याशी लढण्यात जनसंघाच्या नेत्या-कार्यकर्त्यांना फार मोठी ताकद खर्च करावी लागली. या अडथळ्यांना तोंड देत धीम्या पण निश्चित गतीने जनसंघाची वाढ सुरु राहिली. उत्तमराव पाटील हे जनसंघाचे पहिले प्रदेशाध्यक्ष आणि रामभाऊ गोडबोले हे जनसंघाचे पहिले संघटन मंत्री होते. काश्मीरला वेगळा दर्जा देण्याविरोधात केलेल्या आंदोलनामुळे जनसंघाच्या संपर्कात आलेल्या उत्तमरावांनी १९५३ पासून आपली राजकीय कारकीर्द सुरु केली. व्यवसायाने वकील असलेल्या उत्तमरावांनी समाजाच्या विविध घटकांसाठी जनजागृती आणि आंदोलनाचा मार्ग पत्करला १९५४ मध्ये जनसंघातर्फे विधान परिषदेवर निवडून गेलेल्या उत्तमरावांनी १९५७ मध्ये लोकसभेची निवडणूक जिंकली ग्रामीण महाराष्ट्र पिंजून काढत जनसंघाबद्दलचे गैरसमज दूर करण्यासाठी उत्तमरावांनी मोठी मेहनत घेतली. आदिवासींना जमिनीचे पट्टे मिळण्यासाठीचा संघर्ष तसेच विधिमंडळात जाती-जमातींसाठी समित्या निर्माण करण्यासाठीचा आग्रह यातून उत्तमरावांनी जनसंघाचे कार्य विविध समाजघटकांपर्यंत पोहचवले. १९८० मध्ये भारतीय जनता पार्टीची स्थापना झाल्यानंतर उत्तमरावांकडेच प्रदेश अध्यक्षपदाची सूत्रे आली. भाजपाच्या प्रारंभीच्या वाटचालीतही उत्तमरावांनी मोठे योगदान दिले.

जनसंघाचे पहिले संघटनमंत्री असलेले रामभाऊ गोडबोले यांना कार्यकर्ते, निवडणुकीसाठी उमेदवार शोधणे याबरोबरच पक्षासाठी निधी उभारणीचे आव्हानही पेलावे लागले. जनसंघाच्या संघटना प्रसारासाठी पूर्णवेळ कार्यकर्ते उभे करण्याची कल्पना गोडबोले यांनी प्रत्यक्षात आणली. प्रत्येक जिल्ह्यात असे पूर्णवेळ कार्यकर्ते उभे करत रामभाऊंनी संघटनेची बांधणी करणे सुरु केले. उत्तमराव पाटील यांना जनसंघाचे पहिले पूर्णवेळ कार्यकर्ते बनवत रामभाऊंनी विदर्भात लक्ष्मणराव मानकर, रायगडचे प्रभाकरपंत पटवर्धन, नगरचे सूर्यभान वहाडणे, सोलापूरचे अण्णासाहेब कवडी, मुंबईत मधुकरराव महाजन, पुण्यात वसंत परचुरे, नागपूरचे बच्छराज व्यास, कल्याणचे मुकुंद वझे असे डझनभर पूर्णवेळ कार्यकर्ते उभे करत गोडबोले यांनी जनसंघाच्या कामाला वेग दिला. १९५७ च्या निवडणुकीत जनसंघाचे उत्तमराव पाटील आणि प्रेमजी भाई असर हे दोन खासदार तर रामभाऊ म्हाळगी आणि अन्य चौघे आमदार म्हणून निवडून आले. रामभाऊंनी १९७७ पर्यंत जनसंघाची सूत्रे समर्थपणे सांभाळली. त्यानंतर ते राजकारणातून बाजूला झाले. लक्ष्मणराव मानकर यांनी विदर्भात जनसंघाच्या पायाभरणीसाठी आतोनात कष्ट उपसले. भंडारा जिल्ह्यातील पहिले पूर्णवेळ कार्यकर्ते असलेल्या मानकर यांनी उपेक्षित, वंचित समाज घटकांपर्यंत जनसंघाला पोहचवण्यासाठी आंदोलने, लढे यांचा मार्ग पत्करला. १९५७ मध्ये मानकर हे आमगाव मतदारसंघातून विधानसभेवर निवडून गेले. त्यानंतर त्यांनी विदर्भात जनसंघाच्या बांधणीसाठी मोठे योगदान दिले. विदर्भातील अकोला जिल्ह्यातील मोतीराम लहाने यांनीही कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी लढे उभारत जनसंघाचा पाया विस्तारण्यासाठी मोठी मेहनत घेतली. मुंबईत मधुकरराव महाजन यांच्याकडे संघटना बांधणीची जबाबदारी देण्यात आली. मुंबईसारख्या विस्तारणाऱ्या बहुरंगी शहरात महाजन यांनी विलक्षण मेहनतीने, चिकाटीने जनसंघाची संघटना बांधली. बाळासाहेब कानिटकर, हशू अडवाणी, प्रभाकरपंत पटवर्धन अशी कार्यकर्त्यांची फळी मुंबईत तयार झाली. ■





नवी दिल्ली येथे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी.नड्डा यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ज्येष्ठ नेत्या वसुंधरा राजे, राष्ट्रीय सरचिटणीस दुष्यंत कुमार यांची उपस्थिती होती.



**मुंबई– प्रदेश कार्यालय– ज्येष्ठ नेते राम नाईक यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. उपस्थिती–** प्रदेश समन्वयक विश्वास पाठक, प्रदेश मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे, प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, प्रदेश प्रवक्ते अतुल शाह, प्रदेश कार्यालय सचिव मुकुंद कुलकर्णी, सहसचिव भरत राऊत आदी.



**नंदुरबार- उपस्थिती-** प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित, खा. हिनाताई गावित, जि.प.अध्यक्षा डॉ.सुप्रिया गावित, जिल्हाध्यक्ष निलेश माळी, जिल्हा सरचिटणीस सदानंद रघुवंशी, शंकरलाल अग्रवाल, संजय साठे, प्रकाश चौधरी, माणिक माळी, डॉ.सपना अग्रवाल आदी.



**नांदेड- उपस्थिती-** भाजपा महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्षा प्रणिता देवरे-चिखलीकर, भाजपा नांदेड उत्तर ग्रामीण महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष संध्या राठोड आदी.



**नांदेड- ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सत्कार- उपस्थिती-** शक्ती केंद्रप्रमुख रमेश धात्रक, वेंकट मोकले, वेंकट साठे आदी.



**सांगली- ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सत्कार- उपस्थिती-** शेखर इनामदार, संजय कुलकर्णी, विनायक सिंहासने, हालेश शिंगाडे, सुनिल मानकापूरे आदी.



**बीड– उपस्थिती–** प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी, ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा आदी.



**परभणी– उपस्थिती–** बूथ प्रमुख हरिश्‍चंद्र साबळे, शंकर साबळे, बालाजी बंडगर, संजय बंडगर, मुंजा साबळे, आर.डी.भोसले, बाबासाहेब वाघ आदी.



**मालेगाव– ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सत्कार– उपस्थिती–** मालेगाव महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा सुरेखा भुसे, जिल्हाध्यक्ष निलेश कचवे, ज्येष्ठ मान्यवर रविंद्र बापट, नंदू तात्या सोयगांवकर, दादासाहेब जाधव, लकी आबा गिल, दिव्यांग विकास आघाडी जिल्हाध्यक्ष संजय कन्नल आदी.



**इचलकरंजी– ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान– उपस्थिती–** ज्येष्ठ नागरिक उद्योजक शिवलिंग गाडवे, बचाराम तोडकर, विश्‍वास तोडकर, गुंडू चौगुले, मनोज भतगुणकी, प्रकाश चौगुले, शाराबाई शिखरे, मंगल माळी, अलका शेलार, शांता शेलार, मंगल शेलार, निता शेलार, अलका शिखरे, सविता शिखरे, मिनाक्षी चौगुले, कविता तोरगुले, योगिता दाभोळे आदी.



**सातारा– ज्येष्ठ कार्यकर्ते सत्कार– उपस्थिती–** प्रदेश उपाध्यक्ष विक्रम पावसकर, संजय बापू शेडगे, रणजीत माने, तुषार चव्हाण, संग्राम माने, अक्षय मोहिते, मारुती कोरे, अमर शेडगे, सचिन महाराज, योगेश चव्हाण.



**सांगली– उपस्थिती–** जिल्हा सरचिटणीस राजू आवटी, सुमित निकम, निलेश हिंगमिरे, सुहास कलघटगी, मनजित पाटील, शैलेश कुरळे, गणेश वठारकर, योगेश पाटील, भाऊ कुरळे, प्रकाश आवळे, गौरव कानिटकर, अभिषेक तिवडे, विकास गोसावी, प्रसन्ना परांजपे, ज्ञानेश्‍वर केंगार, संजय माने, आदित्य विचारे, रणजीत मोने, रामा देशपांडे, आदी.













**मुंबई– ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सत्कार– उपस्थिती–** माजी आमदार मधु चव्हाण, कांता नलावडे, मोहन बने, श्रीपाद मुसळे, शिल्पा गणपते, शशिकांत शिखरे, रतन गौलानी आदी.








# डॉ. आंबेडकरांचा विचार प्रत्यक्षात आणणारे मोदी सरकार



● शिवप्रकाश, राष्ट्रीय सहसंघटन मंत्री

> भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाकडे दृष्टीक्षेप टाकल्यास त्यांच्या संघर्षमय जीवनाचा परिचय होतो. कुशाग्र बुद्धीमत्ता, अथक परिश्रम घेण्याची तयारी, देशातील शोषित, वंचितांच्या प्रश्नांची नेमकी जाण असलेल्या डॉ.बाबासाहेबांनी आपले संपूर्ण आयुष्य गोरगरीब, दीन-दलितांच्या कल्याणासाठी वाहिले होते. अनेक शतके विकासाच्या मुख्य प्रवाहापासून बाजूला पडलेल्या शोषित, वंचितांना न्याय मिळवून देण्यासाठी लढा देणाऱ्या बाबासाहेबांना या समाजाने आपला महानायक मानले.

**कायदा** विषयाचे प्रकांड पंडित, अर्थतज्ज्ञ असलेल्या बाबासाहेबांनी सामाजिक समतेचा सिद्धांत प्रखरपणे मांडला. कट्टर राष्ट्रप्रेमी बाबासाहेबांनी भारतीय संविधानाच्या निर्मितीत सिंहाचा वाटा उचलला. यावर्षी डॉ.बाबासाहेबांची जयंती लोकसभेच्या निवडणुकीच्या धामधुमीमध्ये साजरी झाली. जवळपास ९७ कोटी मतदार १८ व्या लोकसभेच्या प्रतिनिधी निवडीसाठी मतदान करणार आहेत. यामध्ये प्रथमच मतदान करणाऱ्या युवा मतदारांची संख्या सुमारे २ कोटी आहे. या निवडणुकीत गेली १० वर्षे लोककल्याणकारी सरकारचा अनुभव सामान्य जनतेला देणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना एकमुखी नेतृत्व नसलेल्या, नेत्यांची भाऊगर्दी झालेल्या इंडी आघाडीचा सामना करावा लागत आहे.

काँग्रेस या निवडणुकीसाठी जाहीर केलेल्या जाहीरनाम्यात आपली खरी 'नियत' दाखवून दिली आहे. सत्ता मिळवण्यासाठी काँग्रेस पुन्हा लांगुलचालनाच्या राजकारणाकडे वळली आहे, असे या पक्षाचा जाहीरनामा पाहिल्यावर ठळकपणे दिसून येते. गेल्या काही वर्षात देशात 'लव्ह जिहाद'च्या अनेक घटना घडल्या आहेत. हिंदू धर्मीय तरुणी, महिलांना प्रेमाच्या जाळ्यात फसवून, त्यांचे धर्मांतर करून त्यांचा अनन्वित छळ केल्याच्या अनेक घटना देशभरात घडल्या आहेत. केरळमध्ये अशा घटनांमध्ये तरुणी, महिलांचा राष्ट्रविरोधी कृत्यासाठी वापर केल्याचेही उघडकीस आले आहे. काँग्रेसच्या जाहीरनाम्यातील आश्वासनांमुळे विभाजनवादी मानसिकतेला खतपाणी घातले जात आहे. युरोपातील अनेक देशांना या मानसिकतेतून निर्माण झालेल्या घटकांचा उपद्रव सहन करावा लागत आहे. त्यामुळे अनेक देश आपले कायदे बदलण्याच्या मार्गावर आहेत. उत्तराखंडमधील भाजपा सरकारने संविधातील एक देश-एक नागरी कायदा या तत्वाचा आदर राखण्यासाठी समान नागरी कायदा लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. घटना समितीतील चर्चेवेळी अलादी कृष्ण स्वामी, के.एम.मुन्शी या सदस्यांनी समान नागरी कायदा लागू करण्याची मागणी केली होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनीही समान नागरी कायद्याचे समर्थन केले होते. भारतीय संविधानाच्या मसुद्यात समान नागरी कायदा हा विषय अत्यंत महत्वाचा आहे, असे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी त्यावेळी सांगितले होते. सर्वोच्च न्यायालयानेही अनेक निकालामधून समान नागरी कायदा लागू करण्याची गरज व्यक्त केली होती.

भारतीय जनता पार्टीने राजकारणातील घराणेशाहीला



मुंबईतील इंदू मिलच्या जागेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक बांधण्यात येत आहे. या स्माराकाच्या भूमीपूजनप्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय रस्ते बांधणी मंत्री नितीन गडकरी, तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, रिपब्लिकन पक्षाचे नेते जोगेंद्र कवाडे आदी.


## मुंबईतील इंदू मिल येथील स्मारक

दादर येथील चैत्यभूमीलगत असलेल्या इंदू मिलच्या जागेवर हे स्मारक उभे राहत आहे. ही जागा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकासाठी मिळावी, अशी मागणी आंबेडकरी जनतेची १९८९ पासून होती. त्यानंतर सर्व मागण्या पूर्ण झाल्यानंतर २०१५ साली स्मारकाचे काम सुरु झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते भूमीपूजन झाले. यावर्षी (२०२४ मध्ये) हे काम पूर्ण होणार आहे. या स्मारकाचे मुख्य आकर्षण म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा. स्मारकामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ४५० फूट उंचीचा पुतळा उभारण्यात येणारआहे. या स्मारकात विहार, विपश्यना केंद्र, ग्रंथालय, माहिती केंद्र, सभागृह, वाहनतळ, तिकीटघर, सामान कक्ष, स्वच्छतागृह, नियंत्रण कक्ष, उपाहारगृह आणि अन्य सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत. ४.८ हेक्टर क्षेत्रफळ जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक साकारत असून या प्रकल्पाचा अंदाजित खर्च १०९० कोटी रुपये आहे. प्रकल्पाचे प्रवेशद्वार, इमारत, व्याख्यान वर्ग, ग्रंथालय, बेसमेंटमधील वाहनतळाचे ५० टक्क्यांपेक्षा अधिक काम पूर्ण झाले आहे. इंदू मिलच्या परिसरातील तळ्याची सुधारणा आणि सुशोभिकरण करून महाडच्या चवदार तळ्याची प्रतिकृती साकारली जाणार आहे. स्मारक इमारतीच्या पाठ पीठामध्ये बौद्ध वास्तूरचना शैलीतील घुमट, चैत्यसभागृह, संग्रहालय असेल. तसेच यात प्रदर्शन भरविण्याची सोय असेल.

- पुतळ्याच्या पायथ्याशी पोहोचण्यासाठी पादपीठात ६ मीटर रुंदीचा आंतरिक आणि बाह्य चक्राकार मार्ग प्रस्तावित आहे. यामध्ये विविध कलाकृती साकारल्या जाणार आहेत.
- १००० नागरिक बसण्याच्या क्षमतेच्या प्रेक्षागृहाची उभारणी. आर्टगॅलरी.

## आंबेडकर हाऊस, लंडन येथे डॉ. आंबेडकरांचे स्मारक

लंडन येथील १० किंग हेन्री रोड, एनडब्लू ३ येथील वास्तूमध्ये डॉ. आंबेडकर यांचे स्मारक बनविण्याच्या निर्णय श्री. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना राज्य सरकारने घेतला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे लंडन येथे शिक्षण घेत असताना १९२१–२२ या काळात लंडन शहरातील येथे वास्तव्यास होते. ही वास्तू लंडनमधील भारतीय उच्चायुक्तांच्या माध्यमातून महाराष्ट्र शासनाने विकत घेतली आहे. त्यांच्यामार्फतच या ठिकाणी बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक व वास्तूच्या नूतनीकरणाचे काम सुरू आहे. तेथील स्थानिक स्वराज्य संस्थेने आक्षेप घेतला होता आणि स्मारक बनविण्याची विनंती फेटाळली होती. त्या विरुद्ध महाराष्ट्र सरकारने ब्रिटन सरकारकडे तक्रार केली होती. या तक्रारीची चौकशी करण्यासाठी ब्रिटन सरकारच्या शहर नियोजन विभागाचे निरीक्षक केरी विल्यम्स यांच्या नेतृत्वाखालील समितीची नियुक्ती करण्यात आली होती. या समितीपुढे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि तत्कालीन सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र शासनातर्फे आपल्या वकिलांमार्फत बाजू मांडण्यात आली. आता या वास्तूचे निवासी क्षेत्रातून म्यूझीयम डी १ मध्ये रूपांतर करण्यास परवानगी देण्यात आली आहे. तसेच या वास्तूमध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या करण्यास परवानगी देण्यात आली आहे. संरक्षक भिंत, रेलिंग व दिव्यांगांसाठी लिफ्टचे काम करण्यासही परवानगी देण्यात आली आहे. तेथील स्थानिक स्वराज्य संस्थेने (London Borough of Camden) उपस्थित केलेल्या आक्षेपांवर उत्तर देताना असे सांगण्यात आले की ज्यावेळी ही वास्तू विकत घेतली, त्यावेळी ती अत्यंत जीर्ण अवस्थेत होती. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टिकोनातून तिचे तातडीने नूतनीकरण करणे आवश्यक होते. याबाबत महाराष्ट्र शासनाच्या वतीने लंडनमधील भारतीय उच्चायुक्तांनी कार्यवाही केली आहे. हे काम निवासी म्हणून करण्यात आले आहे. लंडन येथील क्वीन कौन्सिलकडे आवश्यक प्रक्रिया पूर्ण केली जात आहे. या स्मारकामुळे जगभरातील आंबेडकर अनुयायांचे स्वप्न पूर्ण होणार आहे.




प्रखर विरोध दर्शविला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी सातत्याने काँग्रेस आणि अन्य प्रादेशिक पक्षांच्या घराणेशाहीवर कठोर प्रहार करत आहेत. घटना समितीच्या बैठकीत महावीर त्यागी यांनी देशात घराणेशाहीच्या राजकारणाला बळ मिळण्याची भीती व्यक्त केली होती. काही राजकारणी मंडळी भविष्यात आपल्या आणि कुटुंबाच्या हितासाठी सत्तेचा वापर करतील, हे महावीर त्यागी यांनी त्यावेळी वर्तविलेले भाकित काळाच्या ओघात खरे ठरल्याचा अनुभव भारताने घेतला आहे. काँग्रेसनड आपल्या जाहीरनाम्यात सामाजिक न्यायाचा संदेश देणाऱ्या महापुरुषांवरील धड्यांचा समावेश पाठ्यपुस्तकात करण्याचे आश्वासन दिले आहे तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने भवन बांधण्याचे आश्वासनही काँग्रेसने दिले आहे. डॉ.बाबासाहेबांच्या ह्यातीत काँग्रेसने त्यांची उपेक्षा केली, त्यांचा अवमान केला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा लोकसभा निवडणुकीत

## डॉ. आंबेडकर राष्ट्रीय स्मारक

● २६ अलीपूर रोड, दिल्ली येथील राष्ट्रीय स्मारक आहे. हे स्मारक बाबासाहेब आंबेडकर यांना समर्पित आहे. हे बाबासाहेबांचे निवासस्थान होते व येथेच त्यांचे इ.स. १९५६ मध्ये महापरिनिर्वाण झाले. त्यामुळे याला महापरिनिर्वाण भूमी किंवा महापरिनिर्वाण स्थळ म्हणूनही ओळखले जाते. १३ एप्रिल २०१८ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते याचे उद्घाटन व लोकार्पण करण्यात आले. स्मारकातील इमारतीची रचना उघडलेल्या भारतीय संविधानाच्या पुस्तकाप्रमाणे असून हा आकार ज्ञानाच्या शोधाचे प्रतीक आहे. स्मारकासाठी सुमारे २०० कोटी रुपये एवढा खर्च करण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी संबंधीत पंचतीर्थ म्हणजेच पाच स्थळांचा विकास करण्याचं केंद्र आणि स्थानिक राज्य सरकारनं ठरवलं आहे, त्यापैकी हे स्मारक एक आहे.

● स्मारकाच्या प्रवेशद्वारावर ११ मीटर उंचीचा अशोक स्तंभ उभारण्यात आला आहे.

● या स्मारकाच्या इमारतीची रचना उघडलेल्या पुस्तकासारखी आहे, आणि हे पुस्तक भारताचे संविधान आहे. ही रचना ज्ञानाच्या शोधाचे प्रतीक आहे.

● स्मारक परिसरात प्रदर्शन व आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज वस्तुसंग्रहालयाची निर्मिती करण्यात आली आहे.

● बाबासाहेबांच्या कार्याची माहिती देणे, प्रदर्शनाचे आयोजन इत्यादी कार्यक्रम होतात.

● या ठिकाणी बाबासाहेबांचा १२ फुट उंचीचा कांस्य धातूचा एक भव्य पुतळा, डिजीटल प्रदर्शनी, गौतम बुद्धांची ध्यानस्थ मुर्ती आहे.

● थ्री डी इफेक्टद्वारे बाबासाहेब प्रत्यक्ष आपले विचार मांडताना दिसतात.



दोनवेळा पराभव घडवून आणण्यात काँग्रेसचाच हात होता. संसदेतील मध्यवर्ती सभागृहात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा लावावी, ही मागणी त्यावेळचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी फेटाळून लावली होती. पंडित नेहरू यांच्या मनमानी कारभारला कंटाळूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केंद्रीय मंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. अनेक वर्षे देशाची सत्ता भोगणाऱ्या काँग्रेसने डॉ.बाबासाहेबांना भारतरत्न पुरस्काराने गौरविले नाही. पंडित नेहरू यांना मात्र हयात असतानाच भारतरत्न दिला गेला हा इतिहास आहे. शोषित आणि वंचितांना न्याया देण्यासाठी लढाणाऱ्या बाबासाहेबांचा यथोचित सन्मान करण्याऐवजी काँग्रेस नेतृत्वाने त्यांची उपेक्षाच केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या सरकारच्या अनेक निर्णयांमधून बाबासाहेबांचा सन्मान केला. डॉ.बाबासाहेबांशी संबंधित पाच ठिकाणांचा 'पंचतीर्थ' म्हणून विकास करण्याचा निर्णय मोदी सरकारने प्रत्यक्षात आणला आहे. मुंबई इंदू मिलच्या जागेवर डॉ.बाबासाहेबांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारावे, ही मागणी केंद्रातल्या मनमोहन सरकारने मान्य केली नाही. मोदी सरकारने इंदू मिलच्या जागेचा ताबा घेण्यासाठी तांत्रिक व कायदेशीर अडथळे दूर केले. आता तेथे डॉ.बाबासाहेबांचे भव्य-दिव्य स्मारक उभे राहत आहे. या स्मारकातून बाबासाहेबांच्या कार्याचा परिचय संपूर्ण जगाला होऊ शकेल. २६ नोव्हेंबर हा दिवस 'संविधान दिवस' म्हणून साजरा करण्याचा निर्णय मोदी सरकारने घेतला. डॉ.बाबासाहेबांनी आयुष्यभर राष्ट्रहित सर्वोपरी या तत्वानेच आचरण केले. संविधान समितीतील अंतिम भाषणात डॉ.बाबासाहेब म्हणाले होते की, राजकीय फायद्यांपेक्षा देश सर्वश्रेष्ठ आहे. राजकीय पक्षांनी राजकीय फायद्यासाठी राष्ट्रहिताकडे दुर्लक्ष केले तर देशापुढे गंभीर संकट निर्माण होण्याची शक्यता आहे. भारतीय जनता पार्टी आणि मोदी सरकारने डॉ.बाबासाहेबांच्या राष्ट्रहित सर्वोपरी या तत्वानुसारच आचरण केले आहे. ■

# २०२४ च्या निवडणुकीसाठी भाजपाचे संकल्पपत्र



> भाजपाने २०२४ च्या लोकसभा निवडणुकीसाठीचा जाहीरनामा 'संकल्प पत्र' म्हणून जाहीर केला. हे 'संकल्प पत्र' ७६ पानी असून त्याचे प्रकाशन करताना संरक्षण मंत्री राजनाथ सिंह म्हणाले की, लोकांच्या १५ लाख सूचनांच्या आधारे हे तयार करण्यात आले. त्यात 'नमो ॲप'च्या माध्यमातून आलेल्या चार लाखाहून अधिक आणि व्हिडिओच्या माध्यमातून आलेल्या सुमारे १० लाख सूचनांचा समावेश आहे.

**संकल्प पत्रात कोणत्या वर्गासाठी काय आहे ?**

### युवकांसाठी

पेपर–फुटीला आळा घालण्यासाठी नवा कायदा केला जाईल. सरकारी भरती परीक्षांमधील अनियमितता रोखण्यासाठी नवा कायदा बनलेला आहे. आता त्याची कठोर अंमलबजावणी करून युवकांच्या भवितव्याचा खेळखंडोबा करणाऱ्यांना कठोर शिक्षा करण्यात येईल, असे भाजपा ने म्हटले आहे. भाजपा सरकारने सरकारी भरती परीक्षांचे पारदर्शी आयोजन करून लक्षावधी युवकांना सरकारी नोकऱ्या दिल्या आहेत. येत्या काळातही सरकारी भरत्या कालबद्ध आणि पारदर्शी पद्धतीने केल्या जातील. ज्या राज्य सरकारांना सरकारी परीक्षांच्या यशस्वी आयोजनाकरिता मदत हवी असेल त्यांनाही मदत केली जाईल, असेही संकल्प पत्रात म्हटले आहे.

- स्टार्टअप इकोसिस्टिम आणि फंडिंगचा विस्तार.
- स्टार्टअप्सच्या मार्गदर्शनाकरिता को–मेंटॉरशिप.
- सरकारी खरेदीमध्ये स्टार्टअपना प्रोत्साहन.
- मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रामध्ये रोजगाराच्या अधिक संधी.
- पायाभुत क्षेत्रातील वाढत्या गुंतवणुकीमुळे वाढलेल्या रोजगार संधी.
- हाय–व्हॅल्यू सर्व्हिसेसकरिता ग्लोबल सेंटर्स.
- उद्यमशीलतेला चालना.

### शेतकऱ्यांसाठी

- पीएम किसान योजनेद्वारे शेतकऱ्यांना सहाय्य: पीएम किसान योजनेंतर्गत शेतकऱ्यांना ६,००० रुपयांचे वार्षिक सहाय्य देण्यात येते. पंतप्रधान पीक विमा योजनाही अधिक सक्षम करणार.

●मुख्य पिकांच्या आधारभूत किंमतींमध्ये अभूतपूर्व वाढ करण्यात आली आहे. कालबद्ध पद्धतीने २२ पिकांच्या आधारभूत किंमती वाढविणार.

●डाळी व खाद्यतेलांच्या क्षेत्रात आत्मनिर्भरता.

●भाज्या उत्पादन व साठवणुकीकरिता येणार नवी क्लस्टर्स.

●श्री अन्न (भरड धान्ये) विश्व सुपरफुड म्हणून स्थापित करणार

●संशोधन आणि जागरुकता यांनाही चालना.

●नैसर्गिक शेतीचा विस्तार.

●सिंचन सुविधांचा विस्तार.

●सहकार क्षेत्रात जगातील सर्वांत मोठ्या धान्य साठवणुक योजनेंतर्गत प्राथमिक कृषी पत सोसायट्यांच्या (PCS) माध्यमातून साठवणूक क्षमतांचा विकास.

●कीटनाशकांचा वापर, सिंचन, मृदाआरोग्य, हवामानाचा अंदाज आदी कृषी विषयक सेवांकरिता स्वदेशी भारत कृषी उपग्रह सोडणार.

●कृषि क्षेत्रात डिजिटल सार्वजनिक पायाभूत सेवा निर्माण करणार.

●कृषि क्षेत्रातील माहितीमधल्या विसंगती दूर करून शेतकरी केंद्रित सेवा देण्यासाठी डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांची निर्मिती.

## महिलांसाठी

●एक कोटी ग्रामीण महिलांची लखपति दीदी म्हणून क्षमतावृद्धी झालेली आहे. आता तीन कोटी ग्रामीण महिलांना लखपति दीदी बनविण्यात येणार.

●महिला बचतगटांना सेवा क्षेत्राशी जोडून बचतगटांची उत्पादने ग्राहकांपर्यंत पोहोचविण्याची व्यवस्था तयार केली जाणार.

●औद्योगिक आणि व्यावसायिक क्षेत्रांत कार्यरत महिलांसाठी बालगृहांसारख्या मुलभूत सोयी–सुविधाही उपलब्ध असणारी वसतीगृहे बनविणार.

●क्रिडा क्षेत्रातील महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी प्रयत्न करणार. महिलांकरिता सार्वजनिक शौचालये बनविणार तसेच्य त्यांच्या देखभालीची व्यवस्था करणार.

●ॲनिमिया, स्तनांचा कर्करोग, अस्थिभंगूरता, गर्भाशयाचा कर्करोग यांसारख्या व्याधींवर विशेष भर देतानाच स्त्रियांच्या आरोग्याकरिता अधिक प्रयत्न. विशेष अभियानाद्वारे गर्भाशयाचा कर्करोग पूर्ण नष्ट करणार.

●नारी शक्ति वंदन अधिनियमाची अंमलबजावणी करणार.

●पोलिस ठाण्यांत शक्ति डेस्क (महिला मदत कक्ष) स्थापन झाले आहेत. आता तक्रारींचा कालबद्ध तपास आणि कारवाईकरिता त्यांचा विस्तार करणार.

●आणिबाणीच्या परिस्थितीत मदतीकरिता इमर्जन्सी रिस्पॉन्स सपोर्ट सिस्टिमचा विस्तार करून आणिबाणीसाठीची हेल्पलाइन ११२ च्या क्षमता वाढविणार.

## रेल्वेसाठी

●नव्या रेल्वेमार्गांची निर्मिती.

●प्रवासी आणि मालवहन क्षमता वाढविण्याकरिता रेल्वेचे जाळे वाढविणार.

●येत्या काही वर्षांपर्यंत दरवर्षी ५,००० किलोमीटरचे नवे रेल्वेमार्ग बांधणार.

●तिकिटांची उपलब्धता वाढविणार.

●तिकिटांची वेटिंगलिस्ट कमी करण्यासाठी वचनबद्धता.

●कवच ट्रेन सुरक्षा यंत्रणेचा विस्तार.

●आंतरराष्ट्रीय दर्जाची रेल्वेस्थानके बनविणार.

●आधुनिक रेल्वेगाड्यांच्या जाळ्याचा विस्तार करणार.

●आंतरराष्ट्रीय दर्जाच्या वंदे भारत, अमृत भारत आणि नमो भारत रेल्वेगाड्यांचा विकास आणि निर्मिती पूर्ण झाली आहे. आता त्यांच्या जाळ्याचा विस्तार करणार.

●लांब पल्ल्याच्या आरामदायी प्रवासाकरिता वंदे स्लीपर रेल्वेगाड्या सुरू करणार.

●प्रादेशिक दळणवळणासाठी रेल्वेसेवांचा विस्तार करणार.

●दिल्ली आणि मेरठ दरम्यान आरआरटीएस सेवा सुरू झाली आहे. आता अशा रेल्वेसेवांचा अधिक विस्तार करणार.

●तेराशेहून अधिक रल्वेस्थानकांचा आंतरराष्ट्रीय निकषांच्या आधारे पुनर्विकास सुरू आहे. या योजनेमध्ये सर्वच मोठ्या व मध्यम आकाराच्या रेल्वेस्थानकांचा समावेश करणार.

●मेट्रो जाळ्याचा विस्तार करणार.

●पहिला बुलेट ट्रेन कॉरिडॉर विकसीत होत आहे. या बुलेट ट्रेन नेटवर्कच्या विस्ताराकरिता उत्तर, दक्षिण आणि पूर्वेच्या राज्यांतही नव्या कॉरिडॉर्सकरिता फिजिबिलिटी स्टडी करणार.



● रेल्वेशी संबंधित सर्व सुविधा नागरिकांना एकत्र उपलब्ध करून देण्यासाठी सुपर ॲप तयार करणार.

● भारताचा समृद्ध वारसा अनुभवण्यासाठी भारत गौरव रेल्वे सेवा सुरू करण्यात आली आहे. तिचा विस्तार देशाच्या सर्व प्रमुख श्रद्धा केंद्रे व सांस्कृतिक केंद्रांपर्यंत करणार.

### धर्म आणि संस्कृतीसाठी

● काशी विश्वनाथ कॉरिडॉरपासून प्रेरणा घेऊन धार्मिक आणि सांस्कृतिक स्थळांच्या विकासासाठी नव्या योजना सुरू करणार.

● अयोध्येत जगभरातून कोट्यवधी श्रद्धाळू श्री रामललांच्या दर्शनासाठी येत आहेत. अयोध्या नगरीचा सर्वांगीण विकास करणार.

● भारतीय हस्तलिखितांचे संरक्षण आणि अध्ययन, प्राचीन भारतीय संस्कृती, शास्त्रीय भाषा व परंपरांच्या संरक्षणाकरिता एक कोष निर्माण करणार.

● भारतीय साहित्याचा जगभरातील भाषांमध्ये अनुवाद करणार.

● भारतीय ज्ञान परंपरांवर एक त्रैवार्षिक आंतरराष्ट्रीय संमेलन आयोजित करणार.

● समृद्ध सांस्कृतिक वारसा निर्माण करण्याकरिता पुरातत्त्व खात्याच्या अखत्यारीतील (SI) स्मारकांचा जीर्णोद्धार व संरक्षण करणार.

● पर्यटन स्थळांच्या व्यापक विकासाकरिता स्वदेश दर्शन कार्यक्रम सुरू करण्यात आलेला आहे. या कार्यक्रमाला बळ देण्यासाठी राज्य सरकारांसोबत काम करणार. महत्त्वाचे संत व तत्त्वज्ञांच्या जीवनयात्रांना या कार्यक्रमात सम्मिलित करणार.

● पर्यटनासाठी थिमॅटिक सर्किट तयार करणार.

● लक्षद्वीप आणि अंदमान व निकोबार बेटांवर द्वीप पर्यटन केंद्रे सुरू करणार.

● ईशान्य भारत व अन्य डोंगरी राज्यांमध्ये साहस पर्यटनाला चालना देणार.

● वेड इन इंडिया योजनेला चालना देणार.

### भ्रष्टाचाराच्या विरोधात ठोस पावले

● मागील सरकारांच्या तूलनेत आम्ही नागरिकांना पारदर्शी व जबाबदार सरकार प्रशासन दिले आहे. आम्ही भ्राष्टाचार विरोधी कायद्यांचे तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कठोरपणे पालन करू, असे भाजपने म्हटले आहे.

### समान नागरी कायदा

● भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ४४ मध्ये राज्य नीतिअंतर्गत समान नागरी कायद्याची मार्गदर्शक तत्त्व म्हणून नोंद केलेली आहे. भारतात समान नागरी कायदा येत नाही, तोवर महिलांना समान अधिकार मिळणार नाहीत, असे भाजपचे मत आहे. त्यामुळे सर्वोत्तम परंपरांचे पालन करतानाच त्यांना आधुनिक काळाच्या आवश्यकतांनुसार नवे रूप देणारा समान नागरी कायदा आणण्यासाठी भाजप कटिबद्ध आहे.

**आणखी काय विशेष आहे?**

● भारतीय डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चरचा जगभर विस्तार.

● जाहीरनाम्यात म्हटले आहे की, भारताच्या डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चरचे जगभर कौतुक होत असून सहयोगी देशांना हे तंत्रज्ञान देण्यासंदर्भात मोठे काम सुरू आहे.

● योग आणि आयुर्वेदाचा जगभर प्रसार करणार.

● सर्व प्रमुख देशांमध्ये प्रमाणित अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यासंदर्भात योग आणि आयुर्वेद संस्थांना सुविधा पुरविण्यात येतील. सोबतच योग आणि आयुर्वेदातील जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त प्रमाण पत्रांची व्यवस्था सुद्धा निर्माण करण्यात येईल.

● भारतातून अवैध पद्धतीने बाहेर नेल्या गेलेल्या भारतीय मूर्ती आणि कलाकृती परत आणल्या जाणार.

● जगभरातील प्रमुख उच्च शिक्षण संस्थांमध्ये शास्त्रीय भारतीय भाषांच्या शिक्षणाची व्यवस्था तयार करणार.

● भारताच्या सांस्कृतीक वारशाचा विकास.

● भारतीय संस्कृतीच्या स्मारकांचे पुनरुज्जीवन करणार.

● भारतीय सांस्कृतिक स्थळे व स्मारकांचे पुनरुज्जीवन व पुनर्स्थापन यांकरिता आवश्यक तेथे अन्य देशांचे सहाय्य व सहभाग घेतला जाईल.

● भगवान श्री रामांचा वारसा जपला जाईल, त्याचा प्रचार-प्रसार केला जाईल. रामललाच्या प्राणप्रतिष्ठेची आठवण म्हणून जगभर मोठ्या उत्साहात रामायण उत्सव साजरा करणार.

● अंमली पदार्थांच्या विरोधातील लढ्याला बळ देणार.

● न्याय संहिता लवकरात लवकर अंमलात आणणार.

● डाव्या दहशतवादाचा पूर्ण बिमोड करणार.

● सीएएची अंमलबजावणी.

● सशस्त्र दले आणि केंद्रीय सशस्त्र पोलिसदलांचे क्षमतावर्धन.

● एक देश, एक निवडणूक.

● एकच मतदार यादी असावी यासाठी यंत्रणा राबविणार.

● पुढील पाच वर्षे मोफत रेशन देणार.

● ७० पेक्षा अधिक वय असलेल्या सर्वांना आयुष्मान भारत योजनेंतर्गत आरोग्य सेवांचा लाभ देणार.

● आयुष्मान भारत योजनेमध्ये तृतियपंथियांचा समावेश करणार.

● पीएम आवास योजनेंतर्गत तीन कोटी नवी घरे बांधणार.

● स्वयंपाकाचा गॅस पाईपलाईनने पुरविणार.

● पीएम सूर्य घर वीज योजनेंतर्गत के कोट्यवधी कुटुंबांना विजेचे शून्य बिल येणार.

● मुद्रा योजनेंतर्गत कर्जाची रक्कम दहा लाखावरून वीस लाखापर्यंत वाढविणार.

● राष्ट्रीय सहकार धोरण आणणार.

● २०२५ मध्ये जनजातीय गौरव दिवस साजरा करणार.

● जगभर संत तिरुवल्लुवर केंद्रांची स्थापना करणार.

● तमिळ भाषेला प्रोत्साहन देणार.

### २०१९ च्या जाहीरनाम्यात कोणती आश्वासने दिली होती?

भाजपचा २०१९ चा जाहीरनामा ५० पानी होता, ज्यात ७५ आश्वासने दिलेली होती. एकूण बारा समित्यांनी तो जाहीरनामा तयार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती आणि २०२२ पर्यंत त्यातील सर्व आश्वासनांची पूर्तता करण्यात येईल, असे राजनाथ सिंह यांनी त्या जाहीरनाम्याचे प्रकाशन करताना सांगितले होते.

● सीएए

● राम मंदिर

● किसान क्रेडिट कार्डावर एक लाख रुपयांपर्यंत कर्जावर शून्य टक्के व्याज

● एक वर्षापर्यंतच्या कृषि कर्जावर ५ वर्षांपर्यंत व्याज नाही

● देशातील सर्वच शेतकऱ्यांना वार्षिक सहा हजाराची मदत.

● ६० वर्षांनंतर शेतकऱ्यांकरिता पेन्शन योजना.

● ६० वर्षांनंतर छोट्या दुकानदारांसाठी पेन्शन योजना.

● राष्ट्रीय व्यापार आयोगाची स्थापना

● उत्कृष्ट इंजीनियरिंग महाविद्यालयांची क्षमता वाढविणार

● जमिनीच्या सर्व कागदपत्रांचे डिजिटलीकरण

● सर्व घरांमध्ये स्वच्छ पेयजलाची व्यवस्था

● सर्व गरीब घरांमध्ये एलपीजी कनेक्शन

● राष्ट्रीय हायवेंमध्ये दुप्पट वाढ

● ७५ नवी वैद्यकीय महाविद्यालये

● २०२२ पर्यंत सर्व रेल्वेमार्गांचे विद्युतीकरण

● २०२२ पर्यंत सर्व रेल्वेमार्ग ब्रॉडगेज करणार

● प्रत्येक व्यक्तिसाठी पाच किलोमीटरच्या परिघात बँकिंगची सुविधा

● लघु, सूक्ष्म आणि मध्यम उद्योगांसाठी एक खिडकी व्यवस्था

● आदिवासी स्वातंत्र्य सैनिकांचे संग्रहालय

● ट्रिपल तलाकच्या विरोधात कायदा

# काँग्रेसची पावले पुन्हा तुष्टीकरणाकडे

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून म्हणजे १९४७ ते १९७७ अशी सलग ३० वर्षे देशाची सत्ता काँग्रेसकडे केंद्रीत होती. याखेरिज बहुतांश राज्यांमध्ये काँग्रेसचे सरकार होते. ही ३० वर्षे १९८० ते १९९०, १९९१ ते १९९६ ही १५ वर्षे, २००४ ते २०१४ ही १० वर्षे काँग्रेसने देशाची सत्ता भोगली. ५५ वर्षे देशावर राज्य करणाऱ्या काँग्रेसनामक मोठा इतिहास असलेल्या पक्षाला गेल्या १० वर्षात सातत्याने पराभवाची धूळ चाखावी लागते आहे.



**आपण** या देशाचे अनभिषिक्त सम्राटच आहोत, अशा समजात या पक्षाचे मालक असलेले गांधी-नेहरू कुटुंबीय आणि त्यांचे चेले-चपाटे वावरत असतात. सलग १० वर्षे देशाच्या सत्तेपासून बाजूला राहावे लागल्यामुळे आणि आणखी किमान १० वर्षे पुन्हा सत्ता मिळण्याची चिन्हे दिसत नसल्याने काँग्रेसजन हवालदिल झाले आहेत. सत्तेच्या सुखसावलीत सातत्याने राहण्याची सवय लागल्याने विरोधी बाकांवर अंगावर पडणारी ऊन्हं काँग्रेसजनांना सोसेनाशी झाली आहेत. त्यामुळे काहीही करून सत्तेच्या आडोश्याला जाण्याचा आटोकाट प्रयत्न गांधी घराणे आणि त्यांचे झीलकरी करू लागले आहेत. यावेळच्या लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसने प्रसिद्ध केलेल्या जाहीरनाम्यात गांधी घराणाच्या हतबलतेचे विकट दर्शन होत आहे. या हतबलतेतून काँग्रेसला पुन्हा तुष्टीकरणाचा मार्ग कवटाळावासा वाटत आहे. काँग्रेसने दीर्घकाळ तुष्टीकरणाच्या राजकारणाचा अंगीकार केल्यामुळे देशाचे मोठे नुकसान झाले आहे. तुष्टीकरण केल्यामुळे काँग्रेसला १९९० नंतरच्या काळात उतरती कळा लागली, हे ठाऊक असूनसुद्धा काँग्रेस नेतृत्वाने पुन्हा त्याच वाटेला जायचे ठरवले आहे.

सामान्य माणसाला दिलेली आश्वासने पूर्ण करण्याची 'मोदी गॅरंटी'संपूर्ण भारतभर लोकप्रिय ठरली आहे. काँग्रेस नेतृत्वाला 'मोदी गॅरंटी' या शब्द प्रयोगाची नक्कल करावीशी वाटली, यात नवल नाही. आपल्या जाहीरनाम्यात काँग्रेसने २५ गॅरंटीचे आश्वासन दिले आहे. श्रीमती इंदिरा गांधी यांनी १९७१ ची लोकसभा निवडणूक लढविताना 'गरीबी हटाओ'चा नारा दिला होता. इंदिरा गांधींच्या या घोषणेला मतदारांनी भरभरून प्रतिसाद दिल्यामुळे १९७१ मध्ये काँग्रेस मोठ्या बहुमताने पुन्हा सत्तेत आली. काँग्रेसचे 'गरीबी हटाओ'चे आश्वासन कसे गंगा-यमुनेत वाहून गेले, याचा अनुभव संपूर्ण भारतवर्षाने घेतला आहे. अनेक वर्षे प्रचंड बहुमताने सत्ता भोगूनही काँग्रेसला गरिबांची गरीबी हटवता आली नाही.

काँग्रेस नेत्यांची, पदाधिकाऱ्यांची, लोकप्रतिनिधींची गरीबी केव्हाच हटली. मात्र खऱ्या-खुऱ्या गरिबांच्या वाट्याला सातत्याने गरिबीच्या छायेतच राहावे लागले. गोरगरिबांच्या नावाने काँग्रेस काळात अनेक योजना सुरू झाल्या. मात्र त्या योजनांचे फायदे प्रत्यक्ष गरिबांपर्यंत कधीच पोहचले नाहीत. काँग्रेसच्या कल्याणकारी योजनांचे अनुदान सत्ता वर्तुळातील मध्यस्थानी दलाल यांच्याच पदरात जात असे. सत्ता यंत्रणेच्या आणि काँग्रेस नेत्यांच्या निकट असणारा हा वर्ग गब्बरगंड झाला. माजी पंतप्रधान




राजीव गांधी यांना काँग्रेसच्या सत्ता काळात कल्याणकारी योजनांची निधी गरिबांपर्यंत १०० टक्के पोहचत नाही, या निधीला वाटेत अनेक ठिकाणी गळती लागते, हे कटुसत्य कळाले होते. काँग्रेसच्या १९८५ मधील शताब्दी अधिवेशनात त्यांनी सरकारी योजनांच्या एक रुपयातील १५ पैसेच गरिबांपर्यंत पोहचतात, याची जाहीर कबुली दिली होती. अनेक योजना जाहीर करूनही गरीबी हटली नाही, याबद्दल काँग्रेस नेतृत्वाने कधीच खंत प्रकट केली नाही तसेच आपल्या सरकारच्या योजनांचा निधी गरीबांपर्यंत का पोहचला नाही, याचा शोध घेण्याची तयारीही दाखवली नाही.

यावेळच्या जाहीरनाम्यातही काँग्रेसने गोरगरीब वर्गांवर आश्वासनांची खैरात केली आहे. ५५ वर्षे सत्तेत असूनही काँग्रेसने शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादन खर्चाशी निगडीत शेतमाल भाव देण्याची काळजी घेतली नाही. शेतकऱ्यांना हमीभाव देण्याच्या शिफारशी स्वामीनाथन आयोगाने २००४ ते २०१४ या काळात सत्तेवर असलेल्या डॉ.मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील सरकारला सादर केल्या होत्या. मात्र या शिफारशी डॉ.मनमोहन सिंग सरकारने स्वीकारल्या नाहीत. यावेळच्या जाहीरनाम्यात स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी लागू करण्याचे आश्वासन काँग्रेस नेतृत्वाने देऊन टाकले आहे. आपल्या सत्ता काळात शेतकऱ्यांची स्थिती सुधारू न शकणाऱ्या काँग्रेस नेतृत्वाने याबद्दल कधी अपराधी भाव बाळगला नाही. या जाहीरनाम्यातील सर्वात गंभीर आणि आक्षेपार्ह भाग म्हणजे काँग्रेसने तुष्टीकरणाची ओलांडलेली हद्द. अल्पसंख्याकांना वैयक्तिक कायदे निवडण्याचे स्वातंत्र्य देऊ, असे आश्वासन या जाहीरनाम्यात देण्यात आले आहे. मुस्लिम महिलांना घटनेप्रमाणे अन्य महिलांसारखाच पोटगीचा हक्क मिळावा, असा निकाल १९८६ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने शाहबानो खटल्याच्या सुनावणीत दिला होता. या विरोधात कडव्या मुस्लिम संघटनांनी सरकारला इशारे देण्यात सुरूवात केली. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाप्रमाणे सरकार वागले तर काँग्रेसला मुस्लिम मतांवर पाणी सोडावे लागेल, अशी भीती दाखवली गेल्याने त्यावेळच्या राजीव गांधी सरकारने घटना दुरुस्ती करत सर्वोच्च न्यायालयाचा निकाल रद्द ठरवला. आता पुन्हा काँग्रेस स्वातंत्र्य पूर्व काळातील मुस्लिम लीगचा अवतार घेत मतदारांपुढे जाणार आहेत. तिहेरी तलाकची प्रथा किती अन्यायकारक होती, याच्या कहाण्या अनेक सामान्य मुस्लिम महिलांनी सांगितल्या आहेत. ही अन्यायकारक प्रथा मोदी सरकारने रद्द केल्यानंतर मुस्लिम महिलांना मोठा दिलासा मिळाला.

देशातील सर्व नागरिकांना धर्म, जात, पंथ याचा विचार न करता समान नागरी कायदा असावा, असे मार्गदर्शक तत्व भारतीय संविधानात नमूद करण्यात आले आहे. तरीही काँग्रेस नेतृत्व पुन्हा अल्पसंख्यकांना वैयक्तीक कायदे निवडण्याचे स्वातंत्र्य देऊ इच्छित आहे, असा याचा अर्थ आहे. शेतकरी, महिला, युवक या वर्गांवर आश्वासनांची खैरात करण्यात आली आहे. आपण सत्तेवर येऊ, अशी खात्री नसल्याने काँग्रेसने आश्वासनांचा वर्षाव केला आहे. ■

# सीएए कायदा; नेहरुंचा शब्द मोदी सरकारने पाळला

● राम माधव

> ‘इमिग्रंट्स (एक्स्पल्शन फ्रॉम आसाम) ॲक्ट १९५० हा कायदा हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन, शीख या अल्पसंख्य स्थलांतरितांना लागू होणार नाही असे नेहरूंनी त्यावेळी स्पष्ट केलेले होते. आता आम्ही जो कायदा केला तो त्या वेळचे अपूर्ण काम पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे..’’




**काही** गोष्टी या प्रथम सांगायला पाहिजेत. एक तर नागरिकत्व सुधारणा कायदा हा कुणाला वगळण्याशी संबंधित नाही, तर काहींना सामील करून घेण्यासाठी आहे. तत्कालीन पाकिस्तान तसेच अफगाणिस्तानमधील अल्पसंख्याकांना यात नागरिकत्व देण्यात येणार आहे. तत्कालीन वा ‘त्या काळातील’ पाकिस्तान याचा अर्थ बांगलादेश व पाकिस्तान एकत्र होते तो पाकिस्तान. या देशात धार्मिक आधारावर छळ करण्यात आल्याने हे लोक भारतात निर्वासित म्हणून आले होते. नागरिकत्व सुधारणा कायद्यामुळे पहिल्यांदा या शरणार्थींना फाळणीनंतर लगेच झालेल्या जनगणनेत सामावून घेण्यात आले होते, त्यालाही राष्ट्रीय नागरिकत्व नोंदणी (म्हणजे एनआरसी) असेच म्हणावे लागेल. त्यानंतरच्या काळातही काही निर्वासित भारतात आले. प्रत्येक वेळी हे निर्वासित भारतात येत होते व नागरिकत्वावर दावा सांगत होते. त्यावेळी योग्य प्रक्रिया पार पाडून त्यांना नागरिकत्व दिल्याची उदाहरणे आहेत. या तीन देशांतील धार्मिक अल्पसंख्याक धार्मिक व्हिसावर भारतात आले व त्यांच्या देशातील घातक परिस्थितीमुळे नंतर येथेच राहिले; त्यात अफगाणिस्तानातील शीख, पाकिस्तानातून आलेले अनुसूचित जातीचे लोक, बांगलादेशातून आलेले आदिवासी यांचा समावेश आहे.

सरकार आता नागरिकत्व सुधारणा कायद्याच्या माध्यमातून या तीन देशांमधील अल्पसंख्याकांना नागरिकत्व देण्याची प्रक्रिया सोपी करत आहे. आधी नियमित नागरिकत्व कायद्यानुसार नागरिकत्व मिळण्यासाठी १२ वर्षे वाट पाहावी लागत होती. आता नवीन कायद्यानुसार हा कालावधी पाच वर्षे राहील. या तीन देशांतील एखादा अल्पसंख्याक नागरिक भारतात येऊन नागरिकत्व मागू लागला तर तो किंवा ती ३१ डिसेंबर २०१४ पूर्वी भारतात आले आहेत हे सिद्ध केल्यास त्यांना नागरिकत्व दिले जाणार आहे. अर्थात यात त्यांचे येथे पाच वर्षे वास्तव्य असले पाहिजे ही अट यात आहे. या विधेयकाचे आता कायद्यात रूपांतर झाले आहे, पण या विधेयकावरील चर्चेत विरोधकांनी विपर्यास केला. त्यात त्यांनी कलम १४चे उल्लंघन झाल्याचा आरोप करून धर्मनिरपेक्षतेला तिलांजली दिल्याचेही सांगितले. लोकसंख्येतील काही गटांना नागरिकत्व देणे ही नियमित प्रक्रिया आहे. बांगलादेशच्या स्वातंत्र्य युद्धावेळी लाखो हिंदू

व अल्पसंख्याक भारतात आले. हे स्थलांतर हे फाळणीच्या वेळच्या स्थलांतरापेक्षा कमी नव्हते. त्यातील बहुसंख्य लोक हे बंगाल, आसाम व त्रिपुरात आले. त्यांच्यासाठी नंतर छावण्या तयार करण्यात आल्या. त्यांना नागरिकत्व देण्यासाठी सरकारने वेळोवेळी प्रयत्नही केले. या तीन राज्यांत मोठ्या संख्येने बांगलादेशी स्थलांतरित लोक आहेत. त्यांच्याकडे नागरिकत्वाची कागदपत्रे आहेत. त्यामुळे याला कलम १४चे उल्लंघन म्हणता येणार नाही. अशाच सुविधा इदी अमीनच्या राजवटीत युगांडात छळ झालेल्या भारतीयांना देण्यात आल्या होत्या. त्यावेळी कुणी धर्मनिरपेक्षतेचा मुद्दा उपस्थित केला नव्हता. युगांडाच्या लोकांना नागरिकत्व द्यावे अशी मागणी त्यावेळी धर्मनिरपेक्षतेपोटी कुणी केली नव्हती. गृहमंत्री अमित शहा यांनी फाळणीचा मुद्दा उपस्थित करून या मुद्याचे विश्लेषण केले. भारताची फाळणी ही धार्मिक आधारावर झाली आहे व त्यातून मोठ्या प्रमाणावर जातीय हिंसाचार झाला, याकडे डोळेझाक करून चालणार नाही. १९४७ ते १९५० यादरम्यान लाखो लोक सीमा ओलांडून दोन्हीकडे गेले. ते त्या देशांचे नागरिक बनले. पण नंतर अधिकाऱ्यांच्या असे लक्षात आले की, १९५० नंतरही स्थलांतर सुरूच होते. हे लोक ईशान्य भारतात येत होते. हे स्थलांतर फाळणीशी संबंधित नव्हते. त्यावेळी पंडित जवाहरलाल नेहरू यांनी द इमिग्रंट्स (एक्स्पल्शन फ्रॉम आसाम) ॲक्ट १९५० हा कायदा लागू केला होता. त्या कायद्यात असे म्हटले होते की, आसाममध्ये जे स्थलांतरित बेकायदा आलेले आहेत त्यांना सरकार बाहेर काढेल. कारण त्यांचे अस्तित्व आसाम व भारत यांच्यासाठी धोकादायक आहे. जेव्हा अल्पसंख्याकांचा प्रश्न नेहरूंच्या लक्षात आणून दिला तेव्हा त्यांनी त्यांना १९५०च्या कायद्यातून वगळले होते.१९५०च्या कायद्यातील त्या संदर्भातला जो भाग आहे त्यात असे म्हटले आहे की, ज्यांनी त्यांच्या मूळ ठिकाणी ते राहात असताना छळ झाल्याने पाकिस्तानातील घरदार सोडले असेल व भीतीपोटी भारतात आले असतील त्यांना या कायद्यातील तरतुदी लागू होणार नाहीत. म्हणजे त्या स्थलांतरितांना देशाबाहेर हाकलले जाणार नाही. हा कायदा हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन, शीख या अल्पसंख्य स्थलांतरितांना लागू होणार नाही, असे नेहरूंनी त्यावेळी स्पष्ट केलेले होते. आता आम्ही जो कायदा केला तो त्यावेळचे अपूर्ण काम पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे. आता यात बेकायदेशीर स्थलांतरित कोण आहेत हे लगेच शोधून काढणे अवघड आहे. कारण त्यांची संख्या गेल्या काही दशकांत लाखोंच्या घरात आहे. आता आम्ही जो कायदा केला आहे, त्यामुळे या स्थलांतरित लोकांना फायदा होणार आहे. हे लोक फाळणीतील पीडित लोक आहेत. संबंधित तीन देश ईश्वरसत्ताक प्रजासत्ताक देश बनले त्यामुळे त्यांच्यावर तेथे अत्याचार झाले. हा कायदा धर्मनिरपेक्षताविरोधी आहे असा आक्षेप घेतला आहे तो खोटा आहे. स्वातंत्र्यानंतर एकदा नव्हे दोनदा शेजारी देशातील अल्पसंख्याक ही आपलीच जबाबदारी आहे हे मान्य करण्यात आले आहे. पहिली गोष्ट म्हणजे फाळणीनंतर व पुन्हा इंदिरा-मुजीब करारानंतर (१९७२) भारताने १२ लाख शरणार्थींना सामावून घेण्याचे ठरवले होते. यात एक ऐतिहासिक गोष्ट म्हणजे दोन्ही वेळा हिंदू, शीख, बौद्ध व ख्रिश्चन याच धर्माचे लोक आपल्या म्हणजे भारताच्या बाजूला आले. त्यामुळे यात धर्मनिरपेक्षतेच्या विरोधात जाण्याचा प्रश्न येत नाही. अल्पसंख्याकांना नागरिकत्व देण्याचे वचन भारताने नेहमीच दिले आहे. तेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार आता पूर्ण करीत आहे. भारतात श्रीलंकेतून तामिळ तर म्यानमारमधून हिंदू रोहिंग्या स्थलांतरित झालेले आहेत. त्यांना या कायद्यात विचारात घेतलेले नाही. त्याचप्रमाणे नेपाळ व इतर शेजारी देशांतून आलेल्या लोकांचाही विचार केलेला नाही. यातील काहींचा विचार हा द्विपक्षीय करार व नागरिकत्व कायदा यांच्या संदर्भात करण्यात आलेला आहे. राज्यघटनेच्या परिशिष्ट ६ मधील समाविष्ट जे भाग आहेत त्यांना या कायद्यातून वगळण्यात आले आहे. त्यामुळे ईशान्य भारतातील लोकांनी याबाबत चिंता करण्याचे कारण नाही. परिशिष्ट ६ मधील भागांशिवाय जेथे अंतर्गत परवाना पद्धत लागू आहे त्या भागांनाही या कायद्यातून वगळण्यात आले आहे. नागरिकत्व दुरुस्ती कायदा हा सगळ्या देशाला लागू आहे. कुठल्याही राज्याची लोकसंख्यात्मक रचना, संस्कृती, भाषा, रूढी-परंपरा यावर याचा काही परिणाम होणार नाही याची काळजी सरकार घेईल. भारताच्या दोन सहस्रकांच्या इतिहासात आपण नेहमीच अत्याचारित अल्पसंख्याकांना आश्रय दिला आहे. त्यात पारशी, यहुदी व इतर लोक आहेत मग ते कुठूनही आले असोत. भारताच्या त्या परंपरेचे पालन नागरिकत्व सुधारणा कायद्याने केले आहे. ■

# सुधारणेची वेळ का आली?

● डॉ. शैलेंद्र देवळाणकर, परराष्ट्र धोरण विश्लेषक

नागरिकत्त्व सुधारणा कायद्याला होणाऱ्या विरोधाच्या मुळाशी काही गैरसमज असल्याचे दिसून येते. हा कायदा मुस्लिमांविरोधात नसून तो शेजारील देशांतील अल्पसंख्यांकांना नागरिकत्त्व देण्यापुरताच मर्यादित आहे. या लोकांचा छळ हा धर्माच्या आधारावरच झालेला आहे आणि त्याचे बीज भारताच्या फाळणीमध्ये आणि विशेषतः टू नेशन थिअरीमध्ये आहे.

**बांगलादेश,** पाकिस्तान यांनी भारताशी केलेल्या करारांचे उल्लंघन केल्यामुळे तेथील नागरिक भयभीत होऊन भारतात आश्रयाला आले; त्यामुळेच हे पाऊल उचलावे लागत आहे. नागरिकत्त्व कायद्यात यापूर्वीही सुधारणा झाल्या आहेत व तामिळ, बांग्लादेशींना तसेच गेल्या पाच वर्षांच्या काळात सुमारे ५५० मुसलमान लोकांना भारताचे नागरिकत्व दिले गेले आहे, हे लक्षात घ्यायला हवे. या कायद्यात नागरिकत्व काढून घेण्याविषयी कोणतीही तरतूद नाही. तरतुदी आहेत त्या नागरिकत्व देण्याविषयीच्या. याचा चुकीचा संबंध NRC शी लावून अल्पसंख्याकामध्ये गैरसमज पसरवण्याचा प्रयत्न होतो आहे.

NRC ची प्रक्रिया सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार केवळ आसाम मध्ये राबविली गेली. संपूर्ण देशात राबविण्याविषयी कोणतीही प्रक्रिया किंवा नियम अदयाप तयार करण्यात आलेले नाहीत. सध्या देशभर भारतीय नागरिकत्व सुधारणा कायद्यावरून स्फोटक परिस्थिती निर्माण झाली आहे. या कायद्याविरोधात ठिकाठिकाणी आंदोलने होत आहेत. मोर्चे काढले जात आहेत. वास्तविक, या कायद्यासंबंधी कमालीचे गैरसमज लोकांमध्ये आहेत.



अदनान सामी या पाकिस्तानी गायकाने भारतीय नागरिकत्व घेतले आहे.

या कायद्याच्या तांत्रिक बाजू समजून घेतल्यास हे गैरसमज दूर होऊ शकतात. २०१४ मध्ये भारतीय जनता पक्षाने आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात एक महत्त्वपूर्ण आश्वासन दिले होते, ते या भारतीय नागरिकत्व सुधारणा कायद्यासंदर्भातील होते. त्यानुसार २०१६ मध्ये हे विधेयक प्रथम लोकसभेत मांडले गेले. तेव्हा ते लोकसभेत मंजूर झाले; पण राज्यसभेत मांडल्यावर मात्र ते नामंजूर करण्यात आले. त्यानंतर संयुक्त समितीकडे पाठवण्यात आले. या समितीने आपला अहवाल २०१९ मध्ये दिला. २०१९च्या सार्वत्रिक निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे शासन केंद्रात सत्तेवर आल्यामुळे या सरकारने केंद्रीय मंत्रीमंडळाची मंजुरी घेऊन संसदेच्या हिवाळी अधिवेशना ते विधेयक पुन्हा मांडले. लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सभागृहांमध्ये ते बहुमताने मंजूर झाले. त्यानंतर तत्काळ त्यावर राष्ट्रपतींची स्वाक्षरी झाली आणि त्या विधेयकाचे रूपांतर कायद्यात करण्यात आले. नव्याने लागू झालेल्या या भारतीय नागरिकत्व सुधारणा कायद्यात काही प्रमुख तरतुदी आहेत. त्यानुसार भारताच्या सीमारेषांशी संलग्न असणाऱ्या अफगाणिस्तान, पाकिस्तान आणि बांगलादेश या तीन देशांमधील ख्रिश्चन, हिंदू, जैन, बौद्ध, शीख, पारसी या सहा अल्पसंख्याक समुदायाचे जे शरणार्थी भारतामध्ये येतात, त्यांना भारताचे नागरिकत्त्व देण्यात येणार आहे. जर या देशांनी विशेषतः पाकिस्तान आणि बांगलादेशने तेथील अल्पसंख्याकाना भारताबरोबर झालेल्या करारानुसार अल्पसंख्याकांचे संरक्षण केले असते तर भारताला हा कायदा करण्याची गरजच भासली नसती. या अल्पसंख्याकांचा पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तानमध्ये छळ केला गेला. त्या छळाचे मुख्य

कारण धार्मिक होते. धार्मिक आधारावरच त्यांना अनेक यातना सहन कराव्या लागल्या. अत्याचार, बलात्कार यांचा सामना करावा लागला. त्यामुळे ते जीव मुठीत धरून भारताच्या आश्रयाला आले आणि गेली अनेक दशकं ते भारतात राहातही आहेत. तथापि, या शरणार्थींना कोणतेही मुलभूत मानवी अधिकार देता येत नव्हते. कारण त्यांच्याकडे भारताचे नागरिकत्व नव्हते. भारतात त्यांचे वास्तव्य ठिकठिकाणी आहे. त्यांना जमीन खरेदी, शिक्षण असा अधिकार नव्हता. संपत्ती निर्माणाचा अधिकार नव्हता. या लोकांना परत पाठवणेही शक्य नव्हते. कारण त्यांच्या देशात पुन्हा अशाच प्रकारच्या छळाला सामोरे जावे लागले असते. त्यामुळे या शरणार्थींना नागरिकत्व देण्याशिवाय पर्याय नव्हता. ही गोष्ट आज ना उद्या करावी लागणार होती. खरेतर यापूर्वीच या गोष्टी व्हायला हव्या होत्या. पण उशिरा का होईना आता या नव्या कायद्याने भारतात आलेल्या सहा अल्पसंख्यांक समुदायातील नागरिकांना नागरिकत्व दिले जाईल.

यासाठी १९५५ च्या नागरिकत्व कायद्यामध्ये काही महत्त्वाच्या सुधारणा करण्यात आल्या. १९५५ च्या नागरिकत्व सुधारणा कायद्यानुसार चार पद्धतीने नागरिकत्व दिले जाते. नागरिकत्व देण्यात येणाऱ्या व्यक्तीचा जन्म भारतात झालेला असावा, त्याच्या आईवडिलांचाही जन्म याच देशात झालेला असला पाहिजे. याव्यतिरिक्त नोंदणी पद्धतीने आणि प्रतिकूल परिस्थितीत एखाद्या व्यक्तीचे वास्तव्य ११ वर्षांपेक्षा अधिक काळ भारतात असेल किंवा त्याहीपेक्षा जास्त काळ राहिली असेल तर अशा व्यक्तीला नागरिकत्व देण्याची सूचना त्यात करण्यात आली आहे. आताच्या कायद्यात केलेल्या सुधारणांनंतर या सहा समुदायांना नागरिकत्व देण्याबरोबरच ११ वर्षे वास्तव्याची अट शिथिल करून ती सहा वर्षांपर्यंत कमी करण्यात आली आहे. ३१ डिसेंबर २०१४ पर्यंत भारतात अशा पद्धतीने आश्रयाला आलेल्या लोकांना या कायद्यानुसार नागरिकत्व दिले जाणार आहे.

हा कायदा करत असताना सरकारने आश्रित आणि घुसखोर यांच्यात फरक केला आहे. कारण शेजारील देशांतून भारतात आलेल्यांमध्ये काही घुसखोरही आहेत. ते निर्वासितांच्या वेशात भारतात येऊन थांबले आहेत. त्यांना नागरिकत्व देण्याचा सरकारचा उद्देश नाही. परंतु आश्रित म्हणून आणि स्वतःच्या देशात धार्मिक छळ सहन करून भारतात आलेल्यांना नागरिकत्व देण्याचा सरकारचा उद्देश आहे.

विरोधकांनी घेतलेल्या आक्षेपांमध्ये पहिला मुद्दा धर्माचा आहे. नागरिकत्वाचा संबंध पहिल्यांदा धर्माशी लावला गेला असून ते असंविधानिक आहे, असे विरोधकांचे म्हणणे आहे. भारत हा धर्मनिरपेक्ष देश असल्याने धार्मिक आधारावर नागरिकत्व देऊ नये अशी मागणीही त्यांच्याकडून केली जात आहे. तसेच धार्मिक आधारावर नागरिकत्त्व दिले जात असताना विशिष्ट धर्मांचाच समावेश त्यामध्ये का आहे, मुसलमानांना नागरिकत्व का दिले जाणार नाही, असा सवालही विचारला जात आहे. तसेच या सुधारणा विधेयकामुळे भारतीय राज्यघटनेच्या १४ व्या कलमाचा म्हणजे समानतेच्या तत्वाचा भंग होतो असाही आक्षेप घेतला आहे. या आक्षेपांच्या दृष्टीने नव्या कायद्याकडे पाहिले तर दोन्ही आक्षेपांमध्ये तथ्य नाही. मुळातच एका विशिष्ट परिस्थितीतून आलेल्या लोकांसाठी हा कायदा तयार करण्यात आला आहे. जे देश निवडण्यात आले ते तीनही देश मुस्लिम बहुल आहेत. तेथे इस्लामि राजवट आहे. या कायद्यामध्ये ज्या सहा अल्पसंख्याक समुदायांसाठी नागरिकत्व देण्याची शिफारस केली आहे ते सर्व समुदाय या तीनही देशांमध्ये अल्पसंख्यांक म्हणून ओळखले जातात. तेथे इस्लाम हा बहुसंख्यांक आहे आणि हे सहाही धर्म अल्पसंख्यांक म्हणून गणले जातात. यातील पाकिस्तानात तर या अल्पसंख्यांकावर मोठ्या प्रमाणावर अत्याचार होत आहेत. काही दिवसांपूर्वी पाकिस्तानात एका शीख तरूणीचे अपहरण करून तिचे जबरदस्तीने धर्मांतर करण्यात आले होते. अशा घटना वारंवार घडताहेत. बांगलादेशातही असे प्रकार होतात.

भारत आणि पाकिस्तान हे दोन देश जेव्हा स्वतंत्र झाले तेव्हा पाकिस्तानात अल्पसंख्यांकांवर अन्याय होऊ नये यासाठी १९५० मध्ये पंडित जवाहरलाल नेहरू आणि लियाकत अली खान यांच्यामध्ये करार झाला होता. दिल्लीतील गव्हर्नमेंट हाऊसमध्ये या दोघांनीही या करारावर स्वाक्षऱ्या केल्या. यासाठी दोन्हीही देशांनी आपापले अल्पसंख्यांक आयोग स्थापन केले. दोन्ही देशांच्या अधिकाऱ्यांमध्ये सहा दिवस चर्चाही झाल्या. याला दिल्ली पॅक्ट म्हणूनही ओळखले जाते. या करारामध्ये अल्पसंख्यांकांचे जबरदस्तीने धर्मांतर करण्यात येणार नाही, त्यांना समानतेची वागणूक दिली जाईल यांसारख्या

मुद्यांचा समावेश होता. भारताने या कराराचे पालन केले; पण पाकिस्तान सुरुवातीपासूनच या कराराचे उल्लंघन करत आला आहे.

बांगलादेशाबाबततही हाच प्रकार आहे. १९७१ साली बांगलादेश स्वतंत्र झाल्यानंतर शेख मुजीबुर रहमान आणि इंदिरा गांधी यांच्यामध्येही अशाच स्वरूपाचा करार झाला होता. तिथल्या अल्पसंख्यांकांना म्हणजेच प्रामुख्याने हिंदू लोकांना संरक्षण देण्यात यावे असे या करारात नमूद करण्यात आले आहे. पण बांगलादेशातही या कराराचे पालन झाले नाही. विशेषतः खालिदा झिया ज्यावेळी बांग्लादेशच्या पंतप्रधान होत्या तेव्हा तिथे धार्मिक कट्टरतावाद आणि मूलतत्ववाद वाढला. तिथल्या हिंदुंना त्याची खूप मोठी किंमत मोजावी लागली. हिंदूंवर खूप मोठ्या प्रमाणावर अत्याचार झाले. त्या हिंदूना शरणार्थी म्हणून भारतात आश्रय घ्यावा लागला. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सभागृहात हे विधेयक मांडताना हाच मुद्दा प्रामुख्याने मांडला होता. या लोकांचा छळ हा धर्माच्या आधारावरच झालेला आहे आणि त्याचे बीज भारताच्या फाळणीमध्ये आहे.

मोहम्मद अली जीना यांनी टू नेशन थिअरी मांडली होती. त्याआधारे बहुसंख्य मुसलमानांचा पाकिस्तान निर्माण होईल, असे ठरवण्यात आले. याचाच अर्थ फाळणी ही धर्माच्या आधारे झाली. जो भाग मुसलमान बहुल होता तो भाग पाकिस्तान म्हणून निर्माण झाला. धर्माच्या आधारावर पाकिस्तानची निर्मिती झाली आणि त्यानंतर तेथे इतर धर्मीयांवर अन्याय झाला. हा अन्याय जाणीवपूर्वक केला गेला. त्यांच्या जमिनी बळकावण्यासाठी केला गेला. त्यांचे धर्मांतर करण्यासाठी केला गेला. त्यातूनच या लोकांना तिथून हुसकावून लावण्यात आले. त्यामुळे भारताच्या फाळणीतच याची बीजे आहेत. धर्माच्या आधारावर फाळणी न होता दुसऱ्या मुद्याच्या आधारावर झाली असती तर कदाचित परिस्थिती वेगळी असती; पण धर्माच्या आधारावर फाळणी करून बहुसंख्यांक मुस्लिमांचे राष्ट्र म्हणून पाकिस्तान तयार झाला, हे वास्तव आहे. पाकिस्तानची निर्मिती जर धर्माच्या आधारावर झाली नसती तर धर्माच्या आधारे छळ झाला नसता आणि मग नागरिकत्व संशोधन कायदा मांडताना धर्माचा आधार घ्यावा लागला नसता. हा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा आहे आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी हे विधेयक मांडतानाही हाच मुद्दा जोरकसपणे मांडला आहे. बांग्लादेश आणि अफगाणिस्तान हीदेखील इस्लामिक राष्ट्रेच आहेत. अफगाणिस्तानात १९९६ ते २००१ मध्ये तालिबान शासन होते. त्याकाळात तिथेही हिंदू, ख्रिश्चन, बौद्ध लोकांना लक्ष्य केले.

भारतात शरणार्थी म्हणून आलेल्या या लोकांना आपण किती दिवस कोणतेही अधिकार न देता ठेवू शकणार असा प्रश्न निर्माण झाला होता. भारतात निर्वासितांविषयी कोणत्याही प्रकारचा कायदाच अस्तित्वात नाही. जगामध्ये ज्या ज्या देशांमध्ये निर्वासितांविषयी कायदा आहे त्यांना शिक्षणासारखे किमान मूलभूत अधिकार तरी देता येतात. संयुक्त राष्ट्राच्या निर्वासितांविषयीच्या करारावर ज्या देशांनी स्वाक्षऱ्या केल्या त्या त्या देशांमध्ये निर्वासितांविषयी कायदा लागू आहे. भारताने या करारावर सही केलेली नसल्याने भारतात याविषयीचा कायदाही नाही. त्यामुळेच हे निर्वासित कोणत्याही अधिकारांशिवाय भारतात राहाताहेत. या निर्वासितांना काही अधिकार द्यायचे असतील तर कायदा करणे क्रमप्राप्त होते. म्हणून अशा स्वरूपाचा कायदा गरजेचा होता.

सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, या कायद्यात कुठेही अशी तरतूद नाही की या सहा धर्मियांना नागरिकत्त्व दिल्यानंतर परत कधीच कोणाला नागरिकत्व देऊ नये. वेळोवेळी गरज पडेल तसे देताही येऊ शकेल. २०१४ ते २०१९ या पाच वर्षांच्या काळात सुमारे ५५० मुसलमान लोकांना भारताचे नागरिकत्व दिले गेले आहे, हे या ठिकाणी आवर्जून लक्षात घ्यायला हवे. यामध्ये गायक अदनान सामी, लेखिका तसलिमा नसरीन यांचा समावेश आहे. ही बाब न सांगता नागरिकत्व संशोधन कायद्याबाबत गैरसमज पसरवून भीतीचे वातावरण पसरवले जात आहे. ईशान्येकडील राज्यांना तर हा कायदा लागू नाही. परंतू जाणीवपूर्वक भीती निर्माण करून गैरसमज निर्माण केले जात आहेत. उलट भविष्यात गरज भासली तर स्वतंत्रपणे कायदा करून शेजारी राष्ट्रांतील मुसलमानांसह अन्य धर्मांसाठीही तरतूद करता येऊ शकेल.

श्रीलंका, बांग्लादेश आदी देशांमधून लोकांनी आश्रय घेतला तेव्हाही या कायद्यात सुधारणा करण्यात आली होती. त्यामुळे नागरिकत्व कायद्यातील ही पहिलीच दुरुस्ती नाहीये. ■

# मतदार यादी वाचन



**ठाणे- उपस्थिती-** ठाणे विधानसभा विस्तारक किरण दत्तूरे, शक्तीकेंद्र प्रमुख विशाल वाघ, प्रदेश कार्यकारणी सदस्य उषा वाघ, बूथ प्रमुख हुजेफा शेख, गणेश लोखंडे, इमरोज खान, वैभव जाधव आदी.



**छत्रपती संभाजीनगर- उपस्थिती-** सुनिता औरादे मेटे, वंदना पंडित, अश्विनी बक्षी, डॉ. महेश मोहरीर, बी.के.जोशी, कल्याण कडुसकर.



**पुणे- उपस्थिती-** सम्राट थोरात, कसबा निवडणूक प्रमुख हेमंत रासने, कसबा अध्यक्ष राजेंद्र काकडे, चंद्रकांत पोटे, बाप्पू नाईक, निर्मल हरिहर, अभिजित रजपूत, जयदीप शिंदे, आशा शिंदे, कमलेश चव्हाण, रेखा शेलार, ज्योती रजपूत, रिजवान खान, आझाद मामु.



**पनवेल- उपस्थिती-** शांताराम महाडिक, संजय कांबळे, भीमराव पोवार, गोपीनाथ मुंडे, महादेव कोडते, युवराज बेडसे, महानिंग भद्रशेट्टी, गजानन साळवी आदी.



**सोलापूर- उपस्थिती-** विजय इप्पाकायल, वर्षा कटारे, बूथ प्रमुख हर्षल माळवदकर, पद्मा द्यावनपल्ली, वनिता सुरम, अश्विनकुमार गदगे, मल्लेश गाडी, प्रभाकर द्यावनपल्ली, व्यंकटेश बुरा, ज्ञानोबा सारंगी, कृष्णाहरी दुडका.



**पिंपरी चिंचवड- उपस्थिती-** माजी नगरसेवक सागर अंगोळकर, प्रभाग अध्यक्ष दिपक काशिद, रमेश काशिद, संदीप जांभुळकर, श्रीकांत पाचारणे, बूथ प्रमुख अंबादास पडळकर, योगेश गायकवाड, संतोष चव्हाण, दत्तू मगर, शुभम गायकवाड, महेश हुलावळे आदी.



**ठाणे- उपस्थिती-** निलेश लोहोटे, सचिन मांडे, उपेन्द्र पांचाल, दिवाकर शेट्टी, सतिश शेरकर आदी.



**नाशिक- उपस्थिती-** जिल्हा सरचिटणीस सुवर्णा जगताप आदी.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp













**प्रति,**

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com